नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६


मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मराठवाडा – विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रात पिके करपली!

### १५ जिल्ह्यांत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस; अनेक ठिकाणी पावसात तीन आठवड्यांचा खंड

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्यात १ जून ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सरासरीच्या तुलनेत पावसाची सुमारे १४.७ टक्के तूट नोंदविण्यात आली आहे. राज्यात या कालावधीत सरासरी ८२४.५ मि.मी. पावसाची अपेक्षित असताना प्रत्यक्षात ७०३.४ मिमी. पाऊस झाला. सरासरीच्या ८५.३१ टक्के पाऊस पडला असून, १५ जिल्ह्यांमध्ये ७५ टक्क्यांहून कमी पावसाची नोंद झाली आहे. विदर्भ, मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील पर्जन्य छायेच्या प्रदेशात पावसाअभावी पिके करपू लागली आहे. आठवडाभरात पाऊस न पडल्यास पेरण्या वाया जाण्याची



भीती निर्माण झाली आहे. कृषी विभागाने जाहीर केलेल्या जिल्हानिहाय पर्जन्यमान अहवालानुसार राज्यातील सहा महसूल विभागांमध्ये पावसाचे चित्र वेगवेगळे आहे. कोकण विभागात सरासरी २,४८२.६ मिमी. पाऊस पडतो, त्या तुलनेत २,४०५.१ मिमी प्रत्यक्ष पाऊस झाला असून, सरासरीच्या ९६.८४ टक्के पाऊस नोंदविला आहे. त्यामुळे कोकणात पावसाची स्थिती तुलनेने समाधानकारक आहे. नाशिक विभागात सरासरी ५५५.६ मिमी पाऊस अपेक्षित असताना ४१२.५ मिमी पाऊस झाला. नाशिक विभागात सरासरीच्या ७४.२४ टक्के पाऊस पडला आहे. पुणे विभागात सरासरी ७७३.३ मिमी पाऊस पडतो, त्या तुलनेत ५६८.८ मिमी पाऊस झाला. सरासरीच्या ७३.५३ टक्के पाऊस नोंदविला. छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाची स्थिती अधिक चिंताजनक आहे. विभागात सरासरी ७९३.९ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात पर्जन्यमान ३८२.९ मिमी झाले असून, सरासरीच्या तुलनेत पावसाची टक्केवारी सुमारे ७४.५७ टक्के आहे. अमरावती विभागात सरासरी ६१८.९ मिमीच्या तुलनेत ४४९.३ मिमी पाऊस झाला असून, सरासरीच्या ७८.२९ टक्के पाऊस नोंदविण्यात आला आहे. नागपूर विभागात सरासरी ८९७.२ मिमीच्या तुलनेत ६५०.९ मिमी पाऊस झाला असून, पर्जन्यमानाची टक्केवारी ७२.५५ टक्के आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे. पावसाअभावी पिके करपू लागले आहेत. आठवडाभरात पाऊस न झाल्यास मराठवाड्यात पिके वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.



के पावर सोल्युशनचे डायरेक्टर निलेश केळकर यांनी आपल्या कुटुंबासोबत दैनिक समर्थ गावकरी कोकण विभागीय कार्यालयास भेट देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी विभागीय संपादक दशरथ चव्हाण व अस्मिता चव्हाण यांनी त्यांना छत्री दैनिक समर्थ गावकरी अंक व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात...



### खारपाडा टोल स्थगित करावा : तटकरे

अलिबाग (स. गांवकरी) : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत खारपाडा येथे होणारी टोल आकारणी स्थगित करावी, अशी मागणी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. “कोकणातील रस्ते वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. सध्या रस्ता दुभाजक, उड्डाणपूल, साईड पट्टी इत्यादी कामे सुरू असल्याने काही ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू आहे. वाहतुकीसाठी अपेक्षित सोयी सुविधा पूर्ण झालेल्या नसताना खारपाडा येथे होणारी टोल आकारणी बंद व्हावी या कोकणवासीयांच्या भावनेचा आदर करत सदर टोल स्थगित करावा” अशी मागणी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे केल्याचे आदिती तटकरे यांनी सांगितले. भविष्यात मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिक, व्यावसायिक यांना टोलमधे सवलत देण्याबाबतही विचार व्हावा अशी विनंती ही मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात त्यांनी केली आहे.

### ५.८४ लाख नावे यादीतून वगळली

अलिबाग (स. गांवकरी) : विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीमे अंतर्गत रायगड जिल्ह्यातील ५ लाख ८४ हजार ११८ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. जिल्ह्यातील एकूण नोंदणीकृत मतदारांच्या तुलनेत हे प्रमाण २० टक्के आहे. जिल्ह्यात अजूनही १ लाख ९८ हजार मतदार असे आहेत. ज्यांची २००२ च्या मतदार यादीशी जोडणी होऊ शकलेली नाही ही नावेही आगामी काळात वगळली जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम राबविण्यात आली. या मोहीमे अंतर्गत घरभेटी देऊन सर्व मतदारांकडून गणना प्रपत्र भरून घेण्यात आले. २००२च्या मतदार यादीशी जोडणी न झालेली मतदारांची नावे या मोहीमे नंतर वगळण्यात आली आहे. तर संदिग्ध आढळून आलेल्या मतदारांची चौकशी केली जाणार आहे. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात एकूण २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार होते. यातील १९ लाख ४९ हजार ३४१ मतदारांची मॅपिंग आणि गणना प्रपत्राचे डिजीटायझेशन पूर्ण झाले आहे. तर तब्बल ५ लाख ८४ हजार ११८ मतदारांची गणना प्रपत्र संकलन होऊ शकलेले नाही. त्यामुळे ही नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. १ लाख ९८ हजार ३४१ मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी जोडणी होऊ शकलेली नाही.

## मंत्री भेटीविना जरांगेंची नरमाई

### सरकारच्या आश्वासनानंतर जलप्राशन

### मागण्या मान्य होईपर्यंत उपोषणाचा निर्धार

**छत्रपती संभाजीनगर, मुंबई : (स. गांवकरी)**

मराठा आरक्षण मागणीतील सर्व त्रुटी दूर करून ५८ लाख नोंदी असणाऱ्यांना प्रमाणपत्र देऊ, तसेच न्या. शिंदे समितीला कार्यालय देण्याच्या मागणीसह जरांगे यांच्या सर्व अटी मान्य असल्याचे आमदार प्रसाद लाड यांनी आंतरवली सराटीमध्ये सांगितले. त्यानंतर मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगे यांनी उपोषणामध्ये नरमाईची भूमिका घेतली. पाणी पिऊन आणि उपचार घेऊन पुढील चार दिवस आंदोलन करूच, असे त्यांनी सांगितले. सरकारने मात्र जरांगे यांच्याशी चर्चेसाठी उपोषणाच्या पाचव्या दिवशी कोणत्याही मंत्र्यांना पाठविले नाही.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वापरलेली एकेरी भाषा, परभणी येथील कार्यक्रम रद्द करा, असा जरांगे यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर मंत्र्यांनी चर्चेचा मसुदा घेऊन जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनाच पाठवले. यामुळे सरकारने बुधवारी जरांगे यांच्या आंदोलनाकडे पद्धतशीरपणे काणाडोळा करत असल्याचा आरोप होत होता. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह यांनी जरांगे यांना सरकारच्या वतीने मागण्यांबाबत केलेल्या कारवाईचा मसुदा सादर केला.

सरकारच्या वतीने अधिकारी भेटीसाठी आल्याने जरांगे यांनी संताप व्यक्त केला. सरकार आपल्या मागण्यांवर गंभीर नाही, असा आरोप त्यांनी केला. मागण्यांची यादी वाचून दाखवत राधाकृष्ण विखे यांनी सर्व मागण्यांबाबतचे शासन निर्णय घेऊन अंतरवलीस यावे, असे आवाहन केले. तरीही विखे-पाटील बुधवारी रात्रीपर्यंत आंतरवली सराटीत फिरकले नाहीत. परिणामी जरांगे यांनी विखे-पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले. विखेंसह मंत्री उदय सामंत, तसेच आमदार प्रसाद लाड हे शिष्टमंडळातील सदस्य आंदोलकांशी चर्चा करत होते. मात्र, आंतरवली सराटी येथे उपोषणस्थळी केवळ लाड हेच चर्चेसाठी गेले. परंतु त्यामधून मार्ग निघाला नाही आणि मागण्यांची अंमलबजावणी होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार, असे जरांगे म्हणाले. सरकारने दुर्लक्ष केल्याने त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर वडिगोद्री गावाजवळ रास्ता रोको करण्यात आला. त्यामुळे या महामार्गावरील वाहतूक काही काळ बंद पडली होती. मराठा समाजाच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील नोंदी मान्य करायच्या की नाहीत हे सांगा, स्वातंत्र्यपूर्व काळातील दस्तावेज मान्य करावे लागतील. उद्यापासून हैदराबाद गॅझेटियरनुसार प्रमाणपत्रे वाटप झाली तर त्यांची जातपडताळणी प्रमाणपत्रे कशी देणार हे सांगावे. सातारा आणि कोल्हापूर संस्थानांचा आमच्या मागणीप्रमाणे शासन आदेश काढावा, अशा मागण्या जरांगेंनी केल्या आहेत. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाचा बुधवारी पाचवा दिवस असला तरी मंत्री पातळीवर कोणीही जरांगे यांची आंदोलन मागे घेण्यासाठी भेट घेतलेली नाही. फक्त सरकारी अधिकाऱ्यांनी भेट घेतल्याने जरांगे संतप्त झाले आहेत. दुसरीकडे, जरांगे यांच्या अटींपुढे सरकार बधणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यातून महायुती सरकारने दिला आहे.



### बीड, धाराशिवमध्ये आज बंद

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ गुरुवारी बीड आणि धाराशिव जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे.

### जरांगे यांना मुंबईत येण्यापासून रोखणार?

जरांगे यांनी १२ सप्टेंबरपासून मुंबईत आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला आहे. गेल्या वर्षी या आंदोलनाच्या वेळी दक्षिण मुंबईतील सारी व्यवस्था कोलमडून पडली होती. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत उपोषण झाल्यास पोलीस यंत्रणांवर ताण पडू शकतो. हे लक्षात घेता जरांगे यांचे आंदोलन त्यांच्या गावातच कसे संपेल या दृष्टीने सरकारचा भर आहे, असे सांगण्यात आले.

### पाठिंब्याचा अंदाज

जरांगे यांच्या प्रत्येक उपोषणाच्या वेळी सरकार नमते घेते, असे चित्र होते. या वेळी मात्र महायुती सरकारनेही जरांगे यांच्याबाबत काहीशी कठोर भूमिका घेतली आहे. त्यातच जरांगे यांनी मधल्या काळात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर तोंडसुख घेतले. यामुळे शिंदे किंवा शिवसेनेचीही जरांगे यांच्याबाबत सहानुभूती राहिलेली नाही. जरांगे यांना मराठा समाजातून किती पाठिंबा मिळत आहे याकडे सरकारचे लक्ष आहे. त्यासाठी पोलीस व गुप्तचर यंत्रणांना मराठवाड्यात अंदाज घेण्यास सांगण्यात आले आहे. दरवेळी व्यवस्थेला गृहीत धरून कसे चालता येईल, असा सवाल शिष्टमंडळातील सदस्यांपैकी एकाने केला.

## पोस्टमधून तुकाराम मुंढेंचा संताप

**नवी मुंबई : (स. गांवकरी)**

नवी मुंबईत अन्नपदार्थांच्या पाकिटांवरील मुदत संपल्याची तारीख बदलण्याचं मोठं रॅकेट उघडकीस आलं. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली असून, यामध्ये मॅगी आणि लेज यांसारख्या नामांकित ब्रँड्सचा साठा जप्त करण्यात आला. या सगळ्यानंतर आता अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी एक महत्त्वाची पोस्ट केली आहे. जेव्हा एखाद्या पाकिटावरचं लेबल खोटं बोलतं तेव्हा ग्राहकाला त्याची किंमत मोजावी लागते. एक्स्पायरी डेट ही फक्त एखाद्या पॅकिंगवरची शाई नाही. पदार्थाच्या घटकांची पाकिटावरची माहिती ही फक्त माहिती नाही तर ग्राहकाला दिलेली वचनं आहेत. जेव्हा अशी वचनं जाणूनबुजून बदलली जातात तेव्हा तो फक्त नियमाचा भंग ठरत नाही तर तो ग्राहकांसह केलेला विश्वासघात ठरतो. आम्हाला कुठल्याही व्यवसायात भीती किंवा दहशत पसरवायची आहे म्हणून आम्ही नियमावली तयार करत नाही. नियमावली अशासाठी असते की नागरिकांना जे अन्न पदार्थ आणि औषधं विकली जातात ती योग्य आहेत की नाही? त्यातले घटक पदार्थ बरोबर आहेत की नाही. जी वचनं दिली आहेत ती प्रामाणिकपणे पाळली गेली आहेत की नाही? या सगळ्यांसाठी नियमावली असते. ग्राहक आणि व्यापारी यांच्यातलं पोषक आणि पारदर्शक वातावरण निर्माण करण्यासाठी नियमावली असते असं म्हणत तुकाराम मुंढेंनी पोस्ट शेअर केली आहे.

## १०० सहकारी साखर कारखान्यांना दोन हजार कोटींचे कर्ज

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना पुढील गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि शेतकऱ्यांची थकित ऊसाची रास्त आणि किफायशीर भाव (एफआरपी)ची रक्कम वेळेत देण्यास मदत व्हावी, या उद्देशाने केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात ‘सॉफ्ट लोन योजना’ लागू करण्यात येणार आहे. यानुसार साखर कारखान्यांना सात वर्षात परतफेडीच्या अटीवर सुमारे दोन हजार कोटींचे अल्पव्याजी सवलतींचे कर्ज ( सॉप्ट लोन) उपलब्ध करुन देण्यात येणार असून व्याजापोटी सरकारवर दरवर्षी १०० कोटींचा भार पडणार आहे. याबाबतचा प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे पवार यांच्या अध्यक्षतेखाली




सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन पॉलिसी आणि उपपदार्थ निर्मिती धोरण निश्चित करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, वित्त विभागाचे सहसचिव माधव वीर, नियोजन विभागाच्या उपसचिव सविता जावळे आदी उपस्थित होते.

राज्यातील साखर कारखाने सध्या आर्थिक अडचणीत असून मागील गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे एफआरपी पोटी सुमारे २०० कोटी रुपये थकले आहेत.

त्यातच नवा गळीत हंगाम लवकरच सुरु होणार आहे. त्यामुळे अडचणीत आलेल्या साखर कारखान्यांना नवीन हंगामासाठी तसेच शेतकऱ्यांची एफआरपी देण्यासाठी केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारीच सॉप्ल लोन योजना सुरु करण्यात येणार आहे.

कारखान्यांची गाळप क्षमता तसेच आर्थिक ताळेबंद तपासून हे कर्ज दिले जाणार आहे. हे कर्ज सात वर्षे मुदतीसाठी देण्यात येणार असून त्याचे व्याज सरकार भरणार आहे. जिल्हा मध्यवर्ती बँका आणि राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून हे कर्ज उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

## महाराष्ट्र आणि न्यू साउथ वेल्स भागीदारीला नवी दिशा

### भागीदारी अधिक व्यापक करण्यासाठी सामंजस्य करार

**मुंबई : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्स यांच्यात २०१२ पासून असलेली भागीदारी अधिक व्यापक, महत्त्वाकांक्षी आणि परिणामाभिमुख करण्याचा निर्णय घेण्यात आला. वित्तीय सेवा, स्वच्छ ऊर्जा, प्रगत उत्पादन, महत्त्वपूर्ण खनिजे, कृषी तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य विकास, तंत्रज्ञान, संस्कृती आणि क्रीडा अशा विविध क्षेत्रांत सहकार्य वाढविण्यासाठी राज्य सरकार आणि न्यू साउथ वेल्स सरकारमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि न्यू साउथ वेल्सचे प्रमुख (प्रीमियर) क्रिस मिन्स यांच्या उपस्थितीत वर्षा या शासकीय निवासस्थानी हा करार झाला. २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक राज्य बनविण्याच्या उद्दिष्टाशी या सहकार्याची सांगड घालण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मुंबई आणि सिडनी ही भारत आणि ऑस्ट्रेलियाची प्रमुख वित्तीय व व्यावसायिक प्रवेशद्वारे आहेत. न्यू साउथ वेल्समधील वित्तीय संस्था, व्यावसायिक सेवा कंपन्या, पायाभूत सुविधा गुंतवणूकदार आणि



सुपरॲन्युएशन फंडांनी राज्य भारतातील गुंतवणुकीचे प्रमुख प्रवेशद्वार म्हणून पाहावे, असे आवाहन फडणवीस यांनी केले. वाहतूक पायाभूत सुविधा, औद्योगिक कॉरिडॉर, नागरी विकास, अक्षय ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये राज्यात मोठी गुंतवणूक संधी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत उत्पादन या क्षेत्रांत राज्यात उभारल्या जात असलेल्या परिसंस्थेला न्यू साउथ वेल्सच्या खाण तंत्रज्ञान, महत्त्वपूर्ण खनिजे, स्वच्छ ऊर्जा आणि नवोन्मेषातील अनुभवाची जोड मिळू शकते. त्यातून बॅटरी उत्पादन, हरित हायड्रोजन, अक्षय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक क्षेत्रात संयुक्त प्रकल्प उभारण्याची शक्यता आहे. कौशल्य विकासासाठी न्यू साउथ वेल्सच्या ‘टेक्निकल अ‍ॅण्ड फर्दर एज्युकेशन’ संस्था आणि राज्यातील औद्योगिक व कौशल्य विकास संस्थांमध्ये संयुक्त अभ्यासक्रम, प्रशिक्षक प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण तसेच उद्योगाशी संलग्न प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्याचा प्रस्ताव आहे. न्यू साउथ वेल्समधील विद्यापीठांनी नवी मुंबईजवळील आंतरराष्ट्रीय शिक्षण नगरीत सहभागी व्हावे, असे आवाहन फडणवीस यांनी केले. दुष्काळ व्यवस्थापन, शेती आणि जलसंधारणाच्या क्षेत्रातील न्यू साउथ वेल्सचा अनुभव मराठवाडा आणि विदर्भासाठी उपयुक्त ठरू शकतो. कृषी विद्यापीठांमधील भागीदारी वाढविण्यावरही भर देण्यात येणार आहे. कराराची अंमलबजावणी परिणामकारक करण्यासाठी पुढील ९० दिवसांत संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात येणार आहे. प्रमुख प्रकल्प निश्चित करून दोन्ही राज्यांतील संस्थांच्या जबाबदाऱ्या ठरविणे आणि प्रगतीचा नियमित आढावा घेणे ही या कार्यगटाची प्रमुख जबाबदारी राहणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कल्याण फाटा जंक्शनवर सिग्नल यंत्रणेचे उद्‌घाटन

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : कल्याण फाटा जंक्शन (सर्कल) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या सिग्नल यंत्रणेचे उद्‌घाटन कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथजी शिंदे, खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे, आमदार राजेशजी मोरे तसेच शहरप्रमुख व माजी उपमहापौर रमाकांतजी मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण झाले. कल्याण फाटा व शीळफाटा परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक व वाहनचालक त्रस्त होते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील व नगरसेविका अर्चनाताई निलेश पाटील यांनी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना यश मिळून लोढा बिल्डरने पुढाकार घेत कल्याण फाटा सर्कल व शीळ फाटा येथे सिग्नल यंत्रणा उभारली. यासाठी लोढा बिल्डर व त्यांच्या तांत्रिक टीमचे आभार व्यक्त करण्यात आले. नवीन सिग्नल यंत्रणेमुळे परिसरातील वाहतूक अधिक शिस्तबद्ध होऊन कोंडी कमी होण्यास मदत होणार असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. सिग्नल यंत्रणा नियमित व सुरळीतपणे कार्यरत राहावी, यासाठी प्रशासन व वाहतूक पोलीस विभागाने आवश्यक दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी आमदार राजेश मोरे, नगरसेविका अर्चना ताई पाटील, नवी मुंबई नगरसेविका सविता ताई सांगळे, उपशहर प्रमुख चंदू आलिमकर, डायघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीराम पोळ, ठाणे महानगरपालिकेचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे, वाहतूक पोलीस अधिकारी, संबंधित अधिकारी व अभियंते, लोढा बिल्डरची तांत्रिक टीम तसेच शिवसेनेचे पदाधिकारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वैजापूर तालुक्यात हरिण व काळवीट संवर्धन प्रकल्प स्थापन करा

वैजापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील तलवाडा व परिसरामध्ये शासकिय जमीनीवर हरिण व काळवीट संवर्धन प्रकल्प स्थापन करावा या मागणीसाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना छावा संघटनेच्यावतीने तालुकाध्यक्ष किशोर पा.मगर यांनी निवेदन दिले. तलवाडा परिसरात हरिण व काळवीट यासह विवीध प्राण्यांची संख्या अधिक असून या प्राण्यांपासून शेतीचा मोठ्या प्रमाणात उपद्रव सुरु असतो. त्यामुळे पिकांचे खुप नुकसान होत असते. त्यामुळे या परिसरात उपलब्ध असलेल्या जागेवर हरिण व काळवीट संवर्धन प्रकल्प सुरु करावा त्यासाठी या परिसरात नैसर्गिक अधिवास, मोकळे गवताळ क्षेत्र आणि वन्य जीवांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याची क्षमता आहे. तसेच या प्रकल्पामुळे हरिण व काळवीट वन्यजीवांचे संरक्षण, नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन व जैवविवीधतेचे संवर्धन होऊ शकते तसेच शेतीचा होणारा उपद्रव देखिल थांबेल, या प्रकल्पात वन्यजीवांसाठी सुरक्षित अधिवास, पाणवठे, गवताळ क्षेत्र, वृक्ष लागवड, संरक्षण व्यवस्था तसेच पर्यावरण पुरक पर्यटनाच्या सुविधा विकसीत करता येतील. त्यामुळे तलवाडा व परिसरात उपलब्ध शासकिय जमीनीची वन विभागामार्फत तातडीने पाहणी करुन हरिण व काळवीट संवर्धन प्रकल्प सुरु करावा अशी मागणी निवेदनाद्वारे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना दिली असून या निवेदनावर छावा संघटनेचे वैजापुर तालुकाध्यक्ष किशोर पाटील मगर, युवक तालुकाध्यक्ष अजय मोरे, सामाजिक कार्यकर्ते योगेश जाधव यांच्या सह्या आहेत.

### वैजापूर तालुक्यात हरिण व काळवीट संवर्धन प्रकल्प स्थापन करा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदार यादीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी तसेच नागरिकांनी विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेची व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 1 ऑक्टोबर 2026 या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी सर्व तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये तसेच मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आली असून प्रारूप मतदार यादी तसेच अनुपस्थित, स्थलांतरित, मयत व दुबार मतदारांची (ASDD) यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या nanded.nic.in या जिल्हा संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव, वय, पत्ता व इतर तपशील अचूक असल्याची खात्री करावी. मतदारांना voters.eci.gov.in किंवा ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच वोटर हेल्पलाईन ॲपद्वारे नाव तपासता येईल. याशिवाय 1950 या वोटर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून अथवा एसएमएसद्वारेही माहिती घेता येणार आहे. प्रारूप मतदार यादीबाबत 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार असून त्यावर सुनावणी व निपटारा 29 ऑक्टोबर 2026 पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध होणार आहे. 1 ऑक्टोबर 2026 रोजी किंवा त्यापूर्वी 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांनी नवमतदार म्हणून नोंदणीसाठी नमुना 6 अर्ज घोषणापत्र व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. मतदार यादीतील नावाला हरकत अथवा नाव वगळण्यासाठी नमुना 7, तर नाव, वय, पत्ता आदी तपशीलात दुरुस्ती, अपंगत्वाचे चिन्हांकन किंवा मतदारसंघातील पत्ता स्थलांतरासाठी नमुना 8 अर्जाचा वापर करावा.

# पोलिस प्रशासनाची मध्यरात्री मोठी कारवाई

- गणेश कराड यांची कंट्रोल रूमला बदली
- जगदिश मंडलवाड यांच्याकडे किनवट पोलिस ठाण्याची सूत्रे
- राधिका गायकवाड यांच्या उपोषणाची सांगता



किनवट : (स. गांवकरी)

मागील काही दिवसांपासून किनवट पोलिस स्टेशन अंतर्गत सुरु असलेल्या वादंगाचा पोलिस प्रशासनाने मंगळवारी मध्यरात्री मोठी प्रशासकीय फेरबदलाची कारवाई करुन शेवट केला आहे. किनवट पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश कराड यांची कंट्रोल रूममध्ये बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी कंट्रोल रूमचे जगदिश मंडलवाड यांची किनवट पोलिस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे.

या कारवाईच्या केंद्रस्थानी आदिवासी महिला श्रीमती राधिका शामराव गायकवाड यांचे आंदोलन राहिले. गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहाच्या स्वयंपाकगृहात कार्यरत असलेल्या गायकवाड यांनी २० व २१ ऑगस्टदरम्यान बालाजी केंद्रे, रा. कोपरा यांच्याविरुद्ध विनयभंग व आदिवासी महिला म्हणून अवमान केल्याची तक्रार करण्यासाठी किनवट पोलिस ठाणे गाठले होते. मात्र, आपल्याला दिवसभर पोलिस ठाण्यात बसवून ठेवण्यात आले आणि गुन्हा दाखल करण्यात आला नाही, असा आरोप त्यांनी केला होता. तसेच प्रकरण मिटवून टाकण्यासाठी काही व्यक्तींनी आपल्यावर दबाव आणल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणी आदिवासी समाजाच्या प्रतिनिधी मंडळाने जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. रोहन निलभ व उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्याकडे निवेदन देऊन पोलिस निरीक्षक गणेश कराड यांना सहआरोपी करून ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र, अपेक्षित निर्णय न झाल्याने श्रीमती गायकवाड यांनी १ सप्टेंबरपासून उपोषण सुरू केले आणि मागण्यांवर निर्णय न झाल्यास २ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा इशारा दिला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने रात्रीतून हालचाली करत कराड यांची बदली केली. दरम्यान, २ सप्टेंबर रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम व नवनियुक्त पोलिस निरीक्षक जगदिश मंडलवाड यांच्या उपस्थितीत श्रीमती गायकवाड यांचे उपोषण सोडविण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जनाबाई डुडुळे, विद्यार्थी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष विकास कुडमते, आदिवासी नेते प्रा. विजय खुपसे, आदिवासी नेते गोपिनाथ बुलबुले, भाजपाचे जिल्हा सरचिटणिस प्रा. किशन मिरासे, डॉ. वानोळे, जितेंद्र कुलसंगे यांच्यासह आदिवासी समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते. या घटनेने प्रशासनातील अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता संविधान, कायदा आणि कर्तव्य यांना सर्वोच्च प्राधान्य देऊन निष्पक्ष भूमिका बजावण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## रावेत येथील इस्कॉन मंदिरात जन्माष्टमीची जय्यत तयारी

पिंपरी : (स. गांवकरी)

दि. 4 सप्टेंबर 2026 या दिवशी साजरा करण्यात येणार आहे . मंदिराच्या वतीने पिंपरी चिंचवड शहर व पंचक्रोशीतील भाविकांना आवाहन करण्यात येत आहे की , या दिवशी भगवंतांचे दर्शन सकाळी साडेसात वाजेपासून ते रात्री बारा वाजेपर्यंत अखंड दर्शन सुरू राहील व येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसाद वितरण करण्यात येईल. दर मंदिराच्या वतीने दरवर्षी सांस्कृतिक , सामाजिक आणि आध्यात्मिक असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत, ज्यामध्ये लहान मुले आणि तरुण मुलांच्या माध्यमातून अनेक सुंदर सादरीकरण करून दर्शणार्थींना राष्ट्र व समाज हितासाठी आपले महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी प्रोत्साहित केले जाते इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष श्री जगदीश गौरांग दास यांच्या वतीने या दिवशी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना महत्त्वपूर्ण गोष्टींचे आवाहन केलेले आहे ,जसे की 1) ट्रॅफिकची भीषण समस्या निर्माण होऊ नये याकरता रिक्षा किंवा टॅक्सी चा वापर करावा. 2) नवजात शिशु , अत्यंत वयोवृद्ध व खूप आजारी अशा लोकांना शक्यतो मंदिरात आणणे टाळावे . 3) पोलीस प्रशासन व मंदिर प्रशासन यांच्या वतीने वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे 4) दर्शनासाठी दर्शनबारीचा उपयोग करावा , मंदिर प्रशासनाच्या वतीने मेडिकल इमर्जन्सी म्हणून ॲम्बुलन्स आणि वैद्यकीय पथक याची व्यवस्था केलेली आहे करण्यात आले आहे.

5) सकाळी 7 ते सायं 7 पर्यंत जास्तीत जास्त भाविकांनी दर्शनासाठी यावे. कारण सायं. ते मध्यरात्री यादरम्यान भाविक मोठया संख्येने येत असतात त्यामूळे अन्य भाविकांना दर्शनासाठी बराच वेळ रांगेत थांबावे लागते .

## गंगाभागिरथी अनुसया केरू नवले यांचे निधन

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील नवलेवाडी येथील रहिवाशी व शेतकरी कुटुंबातील महिला गंगाभागिरथी अनुसया केरू नवले यांचे अल्पशा आजाराने बुधवारी (२८ ऑगस्ट) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात नवलेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. नवलेवाडी येथील बॉलीवूड, टीव्हीवरील सीनेकलाकार प्रदिप केरू नवले यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात प्रदीप व प्रमोद ही दोन मुले, श्रीमती शिला केरू नवले मुलगी, जाव, सुना, पुतणे, पुतण्या, नातवंड असा मोठा परिवार आहे. नवलेवाडी व पंचक्रोशीत त्या मनमिळावू स्वभावाच्या म्हणून परिचित होत्या.

## गुलाब दामोदर नवले यांचे निधन

अकोले : (स. गांवकरी)



तालुक्यातील नवलेवाडी येथील प्रगतिशील शेतकरी व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुलाब दामोदर नवले (वय ६९) यांचे २९ ऑगस्ट रोजी सर्पदंशाने निधन झाले. ते आपल्या शेतात पिकास पाणी भरीत असतानाच अचानक त्याना सर्पदंश झाला. त्यांनी फोन करून आपला मुलगा सुजित यास याची माहिती दिली. माहीती मिळताच सुजित, सचिन व नातेवाईकांनी त्यांना अकोले येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. ते बुवासाहेब नवले पतसंस्थेचे संचालक व अकोले शहरातील सुजाता ऑफसेट व प्रिंटिंग प्रेसचे मालक सुजित नवले व सचिन नवले यांचे वडील होत.

# डिंबे–माणिकडोह बोगद्याला राज्य सरकारची मंजुरी

- पारनेरच्या २२ हून अधिक गावांसह अहिल्यानगर दक्षिणच्या शेतीला मिळणार नवा जलआधार
- आ. काशिनाथ दातेंची माहिती

पारनेर : (स. गांवकरी)



बुधवार दि. २ सप्टेंबर २०२६ दुष्काळी पारनेरच्या शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नाला निर्णायक दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला असून, डिंबे–माणिकडोह धरणांना जोडणाऱ्या सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याला मंजुरी मिळाली आहे. कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या ₹५,७०४.५० कोटींच्या सुधारित खर्चासही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी स्वागत करत, हा निर्णय पारनेरच्या कोरडवाहू शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करताना पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेच्या दिशेने आणखी एक पाऊल पडले आहे, अशी प्रतिक्रिया आमदार दाते सर यांनी व्यक्त केली. साकळाई योजनेनंतर आता डिंबे–माणिकडोह बोगद्याचा निर्णय झाल्याने पारनेर तालुक्यातील प्रस्तावित उपसा सिंचन योजनांनाही भविष्यात गती मिळण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. डिंबे धरणातील पावसाळ्यात उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात वळविण्याची संकल्पना आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अधिक प्रभावी वापर होऊन कुकडी डावा कालवा व त्याखालील लाभक्षेत्रातील शेतीला त्याचा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे पारनेर तालुक्यातील कुकडी लाभक्षेत्रातील २२ हून अधिक गावांसह अहिल्यानगर दक्षिण, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. कुकडी प्रकल्पातून १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होण्याचा मार्गही या निर्णयामुळे अधिक बळकट होणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार दाते सर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने आभार मानत अभिनंदन केले.

> "पारनेर तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना उपसा सिंचन योजनांच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून देणे हा अनेक वर्षांचा प्रश्न आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून ते दुष्काळी भागाकडे वळविण्याच्या दृष्टीने डिंबे–माणिकडोह बोगदा अत्यंत महत्त्वाचा आहे." साकळाई योजनेनंतर पारनेर तालुक्यातील पाच उपसा सिंचन योजनांच्या सर्वेक्षणास मान्यता व आज रोजी प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरुवात झाली आहे. तर आता डिंबे–माणिकडोह बोगद्याला मिळालेली मंजुरी ही या प्रयत्नांना अधिक व्यापक दिशा देणारी आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी पुढील टप्प्यात कुकडीचे पाणी पारनेरच्या दुष्काळी भागाच्या जास्तीत जास्त शिवारात पोहोचविण्याच्या दिशेने पाठपुरावा सुरूच राहील. शेतकऱ्यांच्या शाश्वत सिंचनाचा प्रश्न मार्गी लावणे, हाच आपल्या प्रयत्नांचा केंद्रबिंदू आहे,"
>
> **- आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

## डिंभे-माणिकडोह बोगद्याला मंजुरी; उत्तर पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा संताप!

### आमदार दिलीप वळसे पाटील यांचा मुख्यमंत्र्यांकडे धाव; मंजुरी रद्द करण्याची मागणी!

पुणे : (स. गांवकरी)



उत्तर पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असतानाही मूळ कुकडी प्रकल्पात समाविष्ट नसलेल्या डिंभे धरण ते माणिकडोह धरण बोगद्याला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याने आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यांतील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. या निर्णयाच्या विरोधात शेतकरी मोठे आंदोलन उभारण्याच्या तयारीत असतानाच आंबेगावचे आमदार तथा माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बोगद्याला विरोध दर्शविला आहे.

नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कुकडी प्रकल्पाच्या तब्बल ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या प्रस्तावाला चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या सुधारित मान्यतेमध्ये मूळ कुकडी प्रकल्पात समाविष्ट नसलेल्या डिंभे-माणिकडोह बोगद्याचाही समावेश करण्यात आल्याचे समोर आले आहे. बोगदा झाल्यास आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यांतील शेतीच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याचे वळसे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

दरम्यान, १८ जुलै २०२४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत डिंभे-माणिकडोह बोगदा न करण्याबाबत आश्वासन देण्यात आले होते, याची आठवणही वळसे पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना करून दिली. या पार्श्वभूमीवर बोगद्याला देण्यात आलेली मंजुरी तातडीने रद्द करावी, अशी मागणी करणारे निवेदन त्यांनी मुख्यमंत्र्यांना सुपूर्द केले. त्यामुळे डिंभे-माणिकडोह बोगद्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, मंत्रिमंडळाच्या निर्णयाबाबत पुढील भूमिका काय घेतली जाते, याकडे आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यांतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## प्रमिला दादाभाऊ नवले यांचे निधन

अकोले : (स. गांवकरी)



तालुक्यातील नवलेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील मातोश्री प्रमिला दादाभाऊ नवले यांचे वृद्धापकाळाने २६ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नवलेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे मुलगा मनोहर नवले व विलास नवले, बेबी विष्णू खोंड (मुलगी), लताबाई मनोहर नवले, इंद्रायणी विलासले नवले, मनिषा कैलास नवले (सुना), सचिन, श्रीकांत, धीरज, आदित्य, अनिकेत, प्रशांत (नातू), दीप्ती, रुपाली, मनाली, यशश्री (नाती) असा मोठा परिवार आहे. त्या अकोले येथील बुवासाहेब नवले मल्टिस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडिट संस्थेचे कार्यकारी संचालक विलास दादाभाऊ नवले यांच्या मातोश्री होत.

## धुळे रोटरी क्लब प्रस्तुत फिनिक्स क्लब चॅम्पियन

धुळे : (स. गांवकरी)

रोटरी क्लब प्रस्तुत फिनिक्स कप नॉर्थ महाराष्ट्र रीजनल चॅम्पियनशिप 2026 टेबल टेनिस स्पर्धेत धुळे येथे 29-30 ऑगस्ट 2026 रोजी पार पडल्या. या स्पर्धेत स्मॅश अकॅडमी संघाने 4 सुवर्ण पदक,2 रौप्य पदक व 2 कांस्य पदक पटकावले. साक्षात शर्मा याने 11 वर्ष वयोगट मुले यात सुवर्ण पदक मिळविले. ईश्वरी पाटीलच्या उत्तम कामगिरीमुळे 15 वर्ष, 17 वर्ष व 19 वर्ष वयोगट मुली या तिन्ही गटात सुवर्ण पदक पटकावले. अवंती तोरडमल हिने 13 वर्ष वयोगट मुलींमध्ये रौप्य पदक जिंकले. निरवी देवळालीकरने 15 वर्ष वयोगट मुलींमध्ये रौप्य पदक मिळवले. अद्वैत जोशी याने 13 वर्ष वयोगट मुले यात कांस्य पदक मिळवले. वेदांत शितोळे याने 15 वर्ष वयोगट मुले यात कांस्य पदक मिळवले. अभिजीत ससाणे याने आपले उत्तम कामगिरी उपांत्यपूर्व फेरी पर्यंत दाखवली.

## अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बहिणींच्या संरक्षणाचा केला संकल्प




अकोले : (स. गांवकरी)

अकोले येथील मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये रक्षाबंधन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या अल्फोन्सा डी. होत्या. पर्यवेक्षक पराग सानप, शिक्षकवृंद व माता-पालक उपस्थित होते. रक्षाबंधनानिमित्त माता-पालकांसाठी राखी बनविणे, चित्रकला व रांगोळी स्पर्धा, तर इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी राखी बनविणे व रंगभरण स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. माता-पालकांचाही सन्मान करण्यात आला. राखी बनविणे स्पर्धेत काजल तुषार डावखर प्रथम, रेवती समीर नाईकवाडी द्वितीय, तर शिल्पा ओंकार वाकचौरे व शुभांगी सतीश बोंबले यांनी विभागून तृतीय क्रमांक मिळविला. चित्रकला स्पर्धेत काजल डावखर प्रथम, काव्या दीपक कदम द्वितीय व रेवती नाईकवाडी तृतीय ठरल्या.

# गाळ्यांतील बेकायदा पोटभाडेकरू हटवा

### आठवडी बाजारातील अतिक्रमण व अस्वच्छ मांस विक्रीवर कारवाईची सतीष नेम्मानिवार यांची मागणी

किनवट : (स. गांवकरी)



किनवट नगर परिषदेच्या मालकीच्या गाळ्यांमध्ये नियमबाह्य पोटभाडेकरू ठेवणे, परवानगीशिवाय गाळ्यांचे हस्तांतरण करणे तसेच लाखो रुपयांच्या व्यवहारातून गाळ्यांचा ताबा बदलणे तातडीने थांबवावे, अशी मागणी भाजपा किसान मोर्चाचे नांदेड उत्तर जिल्हा उपाध्यक्ष सतीष नेम्मानिवार यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. नगर परिषदेने मूळ भाडेकरूंना दिलेले गाळे प्रत्यक्षात अन्य व्यक्तींकडून वापरले जात असल्याच्या तक्रारी असून, काही गाळ्यांचे ₹२० ते ₹५० लाखांपर्यंत कथित व्यवहार होत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने सर्व गाळ्यांचे सर्वेक्षण करून मूळ भाडेकरू व प्रत्यक्ष ताबेदारांची पडताळणी करावी. नियमबाह्य पोटभाडे किंवा अनधिकृत हस्तांतरण आढळल्यास कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गाळे नगर परिषदेकडे ताब्यात घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. आठवडी बाजारातील अतिक्रमणाचा मुद्दाही ऐरणीवर आला असून, काही व्यापाऱ्यांकडून मंजूर जागेपेक्षा मोठ्या क्षेत्रावर, काही ठिकाणी १०० ते २०० फूटपर्यंत जागेवर कब्जा केला जात असल्याची तक्रार आहे. बाजारातील जागांची मोजणी व सीमांकन करून अतिक्रमणे हटवावीत आणि इतर व्यापाऱ्यांना समान संधी द्यावी, अशी मागणी आहे. तसेच बाजार परिसरातील अनधिकृत कुक्कुटपालन, पक्षी विक्री आणि अस्वच्छ पद्धतीने होणाऱ्या मांस विक्रीची तपासणी करून परवाना व आरोग्यविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद आहे.अनधिकृत ताबे हटविल्यानंतर उपलब्ध होणारे गाळे, दुकाने व बाजारातील जागा सार्वजनिक जाहीरात व पारदर्शक प्रक्रियेद्वारे नवीन व गरजू व्यापाऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात. तसेच नगर परिषद मालमत्तेच्या भाडेपट्टा व हस्तांतरणासंदर्भातील लागू कायदे व २०२५ चे नियम काटेकोरपणे राबवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शाडूच्या मातीची गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात!

कल्याण (स. गांवकरी) : लालचौकी येथील शारदा मंदिर हायस्कूलच्या सभागृहात रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण, इनरव्हील क्लब ऑफ कल्याण आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने शाडूच्या मातीची श्री गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत शारदा मंदिर हायस्कूल आणि कॅप्टन ओक हायस्कूलमधील तब्बल १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पर्यावरण संवर्धन व सामाजिक जनजागृती व्हावी, तसेच नागरिकांनी पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करावा, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन मिळाल्याने त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. रोटरियन सुखदा, नामदेव सर, मनोहर भामरे, प्रकल्प अध्यक्षा डॉ. अर्चना सोमानी, अर्चना कर्णिक, सचिव अधिवक्ता साची कदम, रोटरी क्लबचे अध्यक्ष रमेश मोरे तसेच इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा मीनल ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती निर्माण झाली.

## कर -दुचाकी अपघातात एक जण ठार; लहान तांडा येथील तरूणाचा मृत्यू

अर्धापूर (स. गांवकरी) : तमसा रोडवर लहान-लोण गावाजवळ कार दुचाकी मध्ये अपघात झाला असून यामध्ये एक जणांचा मृत्यू झाला आहे. सदर घटना दि.१ सप्टेंबर मंगळवार रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली. संतोष माधव धुमाळे (२२) रा.लहान तांडा ता.अर्धापूर असे मयताचे नाव आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अर्धापूर- तामसा रोडवर लहान-लोण गावाजवळ रस्त्यावर कार आणि दुचाकीचा अपघात झाला यामध्ये दुचाकी वरील संतोष माधव धुमाळे रा. लहान तांडा हे गंभीर जखमी झाले सदर घटनेची माहिती महामार्ग पोलिसांना मिळाली असता त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी संतोष धुमाळे हे गंभीर जखमी झाले होते जखमीस पुढील उपचारासाठी अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. यावेळी पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर, महामार्ग पोलीस कीर्तीकुमार कवठेकर, चालक शैलेश शिरसे, वसंत शिनगारे, पोलीस कर्मचारी महेद्र डांगे, ज्ञानेश्वर भिसे, विजय कदम आदींनी मदत कार्य केले.



## पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावरील गुन्हा तातडीने मागे घ्यावा

सोलापूर (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकार हल्ला विरोधी समिती चे राज्य सरचिटणीस आणि वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांनी ए बी पी माझा चे पुणे प्रतिनिधी मंदार गोंजारी यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे तातडीने मागे घेण्यात यावेत अशी मागणी सरकारकडे केली आहे. जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. पुणे येथील ए.बी.पी. माझा चे पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे तातडीने मागे घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार हल्ला विरोधी समिती चे राज्य सरचिटणीस आणि वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांनी राज्य सरकारकडे निवेदनाद्वारे सोलापूर चे जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन केली केली आहे. पुणे येथील राहुल गांधी यांच्या 'छात्रौ की गुंज 'या कार्यक्रम दरम्यान विध्यार्थ्यांच्या समस्या आणी त्यांच्या आवाज निर्भीडपणे मांडणारे एबीपी माझा चे पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावर COEP प्रशासनाने दाखल केलेला गुन्हा पाठीमागे घेण्यात यावा अशी मागणी वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड व त्यांच्या इतर सहकारी वर्गाने केली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकार हल्ला विरोधी समिती ने आज आक्रमक भूमिका घेत सोलापूर चे जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले आहे पत्रकारांवरील खोटे गुन्हे खपवून घेतले जाणार नाहीत असा इशारा यावेळी राज्य सरचिटणीस महेश गायकवाड यांनी दिला आहे. पत्रकारिता एक वसा ध्यास अन चळवळ असून समाजातील वंचित पिढीत घटकांच्या मूलभूत न्याय हक्कासाठी राज्यात अनेक पत्रकार प्रामाणिकपणे काम करत असून समाजाचे प्रश्न प्रशासन दरबारात मांडून अन्यायग्रस्त अत्याचार ग्रस्त लोकांच्या व्यथा लेखणीच्या माध्यमातून मांडत असतात आकस बुद्धीने अश्या प्रकारचे गुन्हे दाखल करणे यंत्रणेला न शोभणारे आहे लोकांचे प्रश्न समस्या अडचणी आणी वैचारिक भूमिका मांडणारे पत्रकार हल्ली कमी होत चाललेले आहेत. उत्तम अन चांगले पत्रकार जशी माध्यम समूहांची गरज आहे तशीच ती एक सामाजिक गरज देखील आहे बातमी लावण्यावरून गुन्हे दाखल होत असतील तर पत्रकारिता कशी करायची ? आणि कुणाच्या बाजूने करायची ? असा सवाल यावेळी वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांनी उपस्थित केला.

## तरुण उद्योजक सावकारांचे गुलाम?; स्वप्नांवर कर्जाच्या ओझ्याचे सावट

जुन्नर (स. गांवकरी) : देशातील तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय उभारावा, रोजगार निर्माण करावा आणि आत्मनिर्भर व्हावे, यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. 'मेक इन इंडिया', मुद्रा कर्जासह अनेक योजनांच्या माध्यमातून तरुण उद्योजकांना आर्थिक पाठबळ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, शासनाच्या या प्रयत्नांच्या अगदी उलट चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत असल्याची चर्चा आहे. अडचणीत सापडलेल्या तरुण उद्योजकांना खासगी सावकारांकडून मोठ्या व्याजदराने पैसे देण्याचा प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा व्यवसायातील आर्थिक अडचण दूर करण्यासाठी काही तरुण खासगी सावकारांकडून पैसे घेतात. सुरुवातीला मिळणारी ही आर्थिक मदत आधार वाटत असली, तरी त्यावरील अवाजवी व्याजामुळे काही जण कर्जाच्या दुष्टचक्रात अडकत असल्याचे चित्र आहे. जुन्नर तालुक्यातील विविध गावांमध्ये काही खासगी सावकारांकडून अत्यंत जास्त व्याजदराने पैसे दिले जात असल्याच्या चर्चा आहेत. दहा ते वीस टक्क्यांपर्यंत व्याज आकारले जात असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत. कर्जाची रक्कम वेळेत फेडता आली नाही, तर व्याजावर व्याज वाढत जाते. परिणामी मूळ कर्जापेक्षा व्याजाची रक्कम मोठी होण्याची परिस्थिती निर्माण होते. व्यवसायातून मिळणारा पैसा कर्जफेडीत जात असल्याने अनेक तरुणांचे व्यवसाय डबघाईला येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध

## 'महामार्ग जुन्नर तालुक्यातून नकोच'; आजी-माजी आमदार, खासदारांसह जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांना निवेदन देणार

शिवनेरी : (स. गांवकरी)

कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गासाठी जुन्नर तालुक्यातील १८ पेक्षा अधिक गावांमधून प्रस्तावित संभाव्य मार्गासाठी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सर्वेक्षणाला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. कोळवाडी येथे माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट यांच्या निवासस्थानी झालेल्या जाहीर सभा व पत्रकार परिषदेत शेतकऱ्यांनी 'हा महामार्ग जुन्नर तालुक्यातून नकोच' अशी ठाम भूमिका मांडली.



प्रस्तावित महामार्गामुळे मोठ्या प्रमाणावर सुपीक शेतीचे भूसंपादन होणार असून, त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर होणार असल्याची चिंता यावेळी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्व शेतकरी आजी-माजी आमदार, खासदार, सर्वपक्षीय नेते, जिल्हाधिकारी, पालकमंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन महामार्गाला विरोध करणारे निवेदन देणार आहेत.

यावेळी ज्येष्ठ नेत्या मंदाकिनी दांगट, माजी संचालक भगवान घोलप, माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले, सूरज वाजगे, अंबादास हांडे, पोपट राक्षे, बापू कुमकर, स्वप्निल अहिनवे, सुभाष घोलप, विशाल सस्ते, पंकज घोलप यांच्यासह विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, महिला, तरुण तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

तळेरान, मढ, पारगाव, बगडवाडी, कोळेवाडी, सांगणोरे, कोटमवाडी, सीतेवाडी, कोळवाडी, वाटखळ, पांगरी, पिंपळगाव जोगा, डिंगोरे, आहिनेवाडी, सारणी, रोहकडी, उदापूर, ओतूर तसेच या गावांतील वाड्या-वस्त्यांमधील शेतकऱ्यांनी महामार्गाला तीव्र विरोध दर्शविला. प्रस्तावित महामार्गामुळे होणारे भूसंपादन, शेतीचे नुकसान आणि कुटुंबांच्या उपजीविकेवर निर्माण होणारे प्रश्न याबाबत शेतकऱ्यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असून, जमीन गेल्यास त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

जुन्नर तालुका हा माळशेज परिसरासह निसर्गसंपदा, वनसंपदा आणि शेतीने समृद्ध असलेला कृषिप्रधान भाग आहे. त्यामुळे या परिसरातून महामार्ग गेल्यास निसर्ग आणि शेतीवर मोठा परिणाम होईल, अशी भूमिका ज्येष्ठ शेतकऱ्यांनी मांडली. या भागातील हजारो हेक्टर सुपीक जमीन, वन्यजीवांचे अधिवास आणि शेतकऱ्यांचा पारंपरिक उदरनिर्वाह धोक्यात येण्याची भीती व्यक्त करण्यात आली. भूसंपादनामुळे शेतकरी व शेतमजूर कुटुंबे विस्थापित होण्याची शक्यताही महिलांनी व्यक्त केली.

दरम्यान, महामार्गामुळे भविष्यात वाढणारी वाहतूक, धूर आणि प्रदूषण याचा शेती तसेच मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता विद्यार्थी व तरुणांनी व्यक्त केली. 'विकासाच्या नावाखाली विनाश नको. आमच्या वडिलोपार्जित जमिनी आम्हाला द्यायच्या नाहीत,' अशी ठाम भूमिका शेतकरी कुटुंबांनी जाहीर सभेत घेतली.

### 'महामार्ग जुन्नर तालुक्यातून नकोच'

शेतकऱ्यांनी कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गाला जुन्नर तालुक्यातून तीव्र विरोध दर्शविला आहे. या विरोधाची भूमिका प्रशासन आणि शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी आजी-माजी आमदार, खासदार, सर्वपक्षीय नेते, जिल्हाधिकारी, पालकमंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार आहे.

### निसर्ग व शेतीवर घाला नको

जुन्नर तालुका हा माळशेज परिसरासह निसर्गसंपदा, वनसंपदा आणि शेतीवर अवलंबून असलेला कृषिप्रधान भाग आहे. या परिसरातून महामार्ग गेल्यास शेती, पर्यावरण आणि वन्यजीवांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. 'महामार्गामुळे निसर्ग व शेतीवर घाला घालण्यापेक्षा पर्यावरण आणि शेतकऱ्यांचे हित जपले पाहिजे,' अशी भूमिका ज्येष्ठ शेतकऱ्यांनी मांडली.

## वनकर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या ६ आरोपींना २९ महिन्यांची कारावासाची शिक्षा

- सरकारी कामात अडथळा आणून वनकर्मचाऱ्यांना दुखापत केल्याप्रकरणी आहवा न्यायालयाचा कठोर निर्णय

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील उत्तर डांग वनविभागांतर्गत पश्चिम रेंजच्या आहवा राऊंडमधील भवानदगड बीट परिसरात सरकारी कर्तव्य बजावणाऱ्या वनकर्मचाऱ्यांवर हल्ला करून त्यांना दुखापत करणे तसेच सरकारी कामात गंभीर अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आहवा न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. आहवा येथील न्यायालयाने या प्रकरणातील सर्व ६ आरोपींना दोषी ठरवत २९ महिन्यांच्या सक्त कारावासाची शिक्षा आणि एकूण ९ हजार ६०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वनविभागाचे कर्मचारी भवानदगड बीट परिसरात टी.के.बी. अंतर्गत सरकारी तपासणी व चेकिंगची कार्यवाही करत होते. त्यावेळी आहवा तालुक्यातील धुळचोंड गावातील काही व्यक्तींनी एकत्र येऊन बेकायदेशीर जमाव केला आणि वनकर्मचाऱ्यांवर अचानक हल्ला केला. या प्रकरणातील दोषी आरोपींमध्ये १) जिग्नेश गणपतभाई खुरकुटिया, २) उमेश गणपत खुरकुटिया, ३) राजू गणपत खुरकुटिया, ४) मनुभाई झीमन गावळी, ५) जयलू शुकर गावित आणि ६) कमुबेन मनुभाई गवळी यांचा समावेश आहे. आरोपींनी वनकर्मचाऱ्यांवर हल्ला करून त्यांना शारीरिक दुखापत केली तसेच त्यांच्या सरकारी कर्तव्यात अडथळा निर्माण केला होता. या घटनेनंतर पश्चिम रेंज वनविभागाच्या वतीने स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून प्रकरण आहवा येथील न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग (J.M.F.C.) न्यायालयात दाखल केले.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

- सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करा;
- अन्यथा ग्रामसभांवर बहिष्काराचा कळवण तालुक्यातील ग्रामविकास अधिकाऱ्यांचा इशारा

कळवण : (स. गांवकरी)



ग्रामपंचायतअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होतअसून,शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यातअशी मागणी महाराष्ट्र राज्य तांत्रिक संघटनेच्यापदाधिकाऱ्यांसह कळवण तालुक्यातील ग्रामपंचायतअधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली आहे. अधिकाऱ्यांना कामकाज करताना येणाऱ्याअडचणी, वाढता कामाचा ताणआणि विविध कारणांमुळे निर्माण होणाऱ्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न ऐरणीवरआलाआहे.

ग्रामपंचायत पातळीवर शासनाच्या विविध योजना व निर्णयांची प्रभावीअंमलबजावणी करण्याची जबाबदारी अधिकारी-कर्मचाऱ्यांवरअसते. नागरिकांच्या विविध मागण्या, शासकीय योजना, विकासकामे,कर वसुली,ग्रामसभा, प्रशासकीय कामकाज तसेच शासनाच्या निर्देशांचीअंमलबजावणी करताना अनेकदा अधिकाऱ्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र व प्रभावी यंत्रणाउभारणे गरजेचेअसल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.ग्रामसभेच्या कामकाजावर परिणाम होण्याची भीती ग्रामपंचायतअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न शासनाने गांभीर्याने न घेतल्यासआगामी काळात ग्रामसभांच्या कामकाजावरत्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास ग्रामसभांवर बहिष्कार तसेचआंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याबाबत चर्चा करण्यातआली. ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीचा कणा असून,तिचे कामकाज सुरळीत पार पडण्यासाठीअधिकारी-कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण मिळणे अत्यावश्यक आहे. अधिकारी दबावाखाली अथवाअसुरक्षित वातावरणात काम करतअसतील तर त्याचा थेट परिणाम ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजावरआणि विकास प्रक्रियेवर होण्याची शक्यता आहे.ठोस सुरक्षा धोरणाची मागणी

ग्रामपंचायतअधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी शासनाने सुरक्षा धोरण निश्चित करावे, कार्यालयीन कामकाजादरम्यान होणाऱ्या दबावाला आळा घालण्यासाठी स्पष्ट नियम करावेत, तसेच संवेदनशील परिस्थितीतआवश्यक पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे,अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण मिळावे,कार्यालयीन कामातअनावश्यक हस्तक्षेप होऊ नये आणि कायदेशीर कर्तव्य बजावताना अधिकाऱ्यांच्या पाठीशी प्रशासनाने ठामपणे उभे राहावे, अशीअपेक्षाही व्यक्त करण्यातआली.

यावेळी महाराष्ट्र राज्य तांत्रिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री.रवी ठाकरे,तालुकाध्यक्ष श्री. अनिल चव्हाण, तालुका सचिव श्री. हडस भाऊसाहेब, तालुका कोषाध्यक्षश्री. ज्ञानेश्वर देशमुख यांच्यासह कळवण तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी,कर्मचारी व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. "ग्रामपंचायतअधिकारी-कर्मचारी हे शासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवाआहेत.

# कळवण प्रकल्प कार्यालयात १० सप्टेंबरला पेन्शन अदालत

- सेवानिवृत्त आदिवासी कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न

कळवण : (स. गांवकरी)



आदिवासी विकास विभागाच्या कळवण एकात्मिकआदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत सेवानिवृत्त झालेल्या वर्ग३व वर्ग४ कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबितप्रश्नांना वाचा फोडण्यासाठी दि१० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कळवण प्रकल्पकार्यालयात पेन्शनअदालत आयोजित करण्यात आली आहे.प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यकजिल्हाधिकारी डॉ.कश्मिरा संखे यांच्याअध्यक्षतेखाली ही पेन्शनअदालत होणारअसल्याची माहिती सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष एस.के. पगार यांनी दिली.कळवण आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कळवण, देवळा,सुरगाणा, सटाणा,चांदवड, मालेगाव व नांदगाव या साततालुक्यांचा समावेश होतो.या प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय व अनुदानितआश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमधूनअनेक वर्ग३व वर्ग४कर्मचारी सेवेतून निवृत्त झाले आहेत सेवानिवृत्तीनंतरही काही कर्मचाऱ्यांना पेन्शन,पेन्शनची थकीत रक्कम, निवृत्तीवेतनाशी संबंधित लाभ तसेच इतर सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभअद्याप मिळालेले नसल्याच्या तक्रारी आहेत.काही सेवानिवृत्तकर्मचाऱ्यांचे निधन झालेअसून त्यांच्या कुटुंबीयांनाही संबंधित लाभ मिळण्यासाठी कार्यालयीन प्रक्रियेत अडचणी येतअसल्याचे संघटनेचे म्हणणेआहे.

सेवानिवृत्तकर्मचाऱ्यांच्याअनेक वर्षांपासून प्रलंबितअसलेल्या प्रश्नांमध्ये पेन्शन प्रकरणे,निवृत्तीलाभ, कागदपत्रांची पूर्तता, प्रलंबित प्रस्ताव,थकीत देयके तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मिळणारे लाभ यांसारख्या विषयांचा समावेश आहे.त्यामुळे पेन्शन अदालत ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी आपल्या समस्याथेट प्रशासनासमोर मांडण्याची महत्त्वाची संधी ठरणार आहे.प्रलंबित प्रकरणांमध्ये नेमकी अडचण कुठेआहे, कोणती कागदपत्रे अपूर्णआहेत,कोणत्या स्तरावर प्रस्ताव रखडलेआहेत,याची माहिती घेऊन संबंधित प्रकरणांचा पाठपुरावा करण्यास याअदालतीमुळे मदत होण्याची अपेक्षा आहे.

या पेन्शन अदालतीस सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष डी.पी.भरसट तसेच विभागीयअध्यक्ष एस. एस.खैरनार उपस्थित राहणारआहेत. यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा होऊन प्रशासनाकडून योग्य कार्यवाहीकरण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीआपल्या समस्यांचे स्वरूप, प्रलंबित प्रकरणाची माहिती व संबंधित कागदपत्रांसह लेखी स्वरूपातअर्ज घेऊन पेन्शनअदालतीस उपस्थित राहावे,असे आवाहन करण्यात आलेआहे. यावेळी कर्मचारी संघटनेचेअध्यक्ष एस. के.पगार,उपाध्यक्ष एन. डी.भामरे,सचिवआर. जी.वाडेकर, सल्लागार ए.एल.खंबाइत,के. जे. शिरोडे तसेच संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य उपस्थित राहणार आहेत.

# इगतपुरी तालुक्यात स्वाईन फ्लूचा शिरकाव

इगतपुरी : (स. गांवकरी)



- आरोग्य यंत्रणा अलर्ट
- एका रुग्णावर उपचार सुरू
- खासगी रुग्णालयातील चार संशयित रुग्णांची माहिती घेण्याचे काम सुरू

इगतपुरी तालुक्यात स्वाईन फ्लूचा शिरकाव झाल्याची माहिती समोर आल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. सध्या एका रुग्णावर उपचार सुरू असून, खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या आणखी चार संशयित रुग्णांची माहिती आरोग्य विभागाकडून घेण्यात येत आहे. रुग्ण आढळून आल्यानंतर आरोग्य विभागाने खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या असून, संभाव्य रुग्णांचा शोध घेण्यासह नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. तालुक्यात स्वाईन फ्लूचा संसर्ग वाढू नये यासाठी आरोग्य विभागाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी ताप, खोकला, घसा दुखणे, सर्दी, अंगदुखी, अशक्तपणा यांसारखी लक्षणे आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. स्वतःहून औषधोपचार करण्याऐवजी तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. दरम्यान, स्वाईन फ्लूच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती काळजी घ्यावी आणि आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उत्कर्षाने ४ तासांत सर केला २८१५ फूट उंचीचा माहुली गड!

## चिराडपाड्याच्या चिमुकलीचा सह्याद्रीच्या कुशीत धाडसी पराक्रम; दुर्गप्रेमींकडून कौतुकाचा वर्षाव

भिवंडी : (स. गांवकरी)



भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील चिराडपाडा गावातील अवघ्या साडेतीन वर्षांच्या कु. उत्कर्षा दत्तात्रय कारवे या चिमुकलीने आपल्या आई-वडिलांसोबत ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील प्रसिद्ध माहुली गडाची २८१५ फूट उंचीची चढाई तब्बल चार तासांत पूर्ण केली. पावसाळ्यानंतरचा निसरडा मार्ग, उभे चढ-उतार आणि आव्हानात्मक वाट पार करत उत्कर्षाने कोणताही थकवा न दाखवता उत्साहाने हा ट्रेक पूर्ण केला. माहुली गड हा सह्याद्रीतील प्रसिद्ध आणि चढाईच्या दृष्टीने आव्हानात्मक किल्ल्यांपैकी एक मानला जातो. अशा कठीण वाटेवर अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीने आपल्या आई-वडिलांसोबत आत्मविश्वासाने केलेली ही चढाई विशेष कौतुकास्पद ठरली आहे. उत्कर्षाला सह्याद्रीतील प्रसिद्ध ट्रेकर आणि विश्वविक्रमवीर शिवकन्या कु. शर्विका म्हात्रे हिच्या साहसी कामगिरीची प्रेरणा मिळाली. तिचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत उत्कर्षानेही सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये आपली पहिली मोठी झेप घेतली. ट्रेकदरम्यान अनेक ठिकाणी निसरडा रस्ता, खडतर चढाई आणि उभे उतार अशी आव्हाने होती. मात्र, उत्कर्षाने न डगमगता प्रत्येक टप्पा उत्साहाने पार केला. कुटुंबीयांच्या प्रोत्साहनामुळे तिचा आत्मविश्वास अधिक वाढला आणि अखेर चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर तिने माहुली गडाचा माथा गाठला. उत्कर्षाच्या या धाडसी कामगिरीची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, दुर्गप्रेमी आणि निसर्गप्रेमींकडून तिचे कौतुक होत आहे. एवढ्या लहान वयात सह्याद्रीच्या कडेकपारीत केलेली ही चिमुकलीची धाडसी वाटचाल अनेक बालकांसाठी आणि पालकांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.तर उत्कर्षा आणि तिची आई. आईवडिलांनी पुढील दोन वर्षात महाराष्ट्रातील १०० गडकिल्ले सर करण्याचा दृढ निश्चय केला आहे.

"आम्हाला आमच्या लेकीचा प्रचंड अभिमान वाटतो. सुरुवातीला एवढा मोठा किल्ला ती चढू शकेल का, अशी धास्ती होती. मात्र तिचा उत्साह आणि ऊर्जा पाहून आमचाही आत्मविश्वास वाढला. तिने संपूर्ण ट्रेक अतिशय उत्साहाने पूर्ण केला. हा क्षण आमच्यासाठी आनंददायी, प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे."

**आई - दर्शना कारवे, वडील- दत्तात्रय कारवे**

# अथांग काळी यांची सीएनसीएफ एलएफएक्स मेंटरशिप प्रोग्रामसाठी निवड

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)




श्री गुरु गोबिंदसिंघजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी विष्णुपुरी, नांदेड येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी अथांग काळी यांची "क्लाउड नेटिव्ह कम्प्युटिंग फाउंडेशन" अंतर्गत एलएफएक्स मेंटॉरशिप प्रोग्राम सीएनसीएफ टर्म - ३, 2026 साठी निवड झाली आहे. अथांग काळी यांची सीएनसीएफ हेडलॅम्प या प्रकल्पासाठी निवड झाली असून, या प्रकल्पांतर्गत ते किव्हर्नो पॉलिसी व्हिज्युअलायझेशन अँड ऑपरेशनल एन्हान्समेंट्स या विषयावर काम करणार आहे. या तीन महिन्यांच्या मेंटरशिप दरम्यान त्यांना जागतिक स्तरावरील मुक्त स्रोत प्रकल्पात योगदान देण्याची संधी मिळणार असून, मायक्रोसॉफ्ट मधील अनुभवी सॉफ्टवेअर डेव्हलपर्स आणि मेंटर्सकडून त्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. या मेंटरशिप प्रोग्रामचा भाग म्हणून अथांग काळी यांना तीन महिन्यांसाठी 1,300 अमेरिकन डॉलर इतका स्टायपेंड मिळणार आहे. या कालावधीत त्यांना सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटचा प्रत्यक्ष अनुभव, आंतरराष्ट्रीय मुक्त स्रोत समुदायासोबत काम करण्याची संधी तसेच वास्तविक तांत्रिक प्रकल्पांवर काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. एलएफएक्स मेंटॉरशिप प्रोग्राम हा उपक्रम विद्यार्थ्यांना आणि नवोदित डेव्हलपर्सना आघाडीच्या मुक्त स्रोत प्रकल्पांशी तसेच अनुभवी तंत्रज्ञान व्यावसायिकांशी जोडतो. निवड झालेल्या मेंटीजना प्रत्यक्ष तांत्रिक प्रकल्पांवर काम करण्याची, अनुभवी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेण्याची आणि जागतिक मुक्त स्रोत समुदायामध्ये योगदान देण्याची संधी मिळते. अथांग काळी यांची झालेली ही निवड इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग तसेच श्री गुरु गोबिंदसिंघजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी विष्णुपुरी, नांदेड यांच्यासाठी उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे. त्यांच्या तांत्रिक ज्ञानाची आवड, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमधील योगदान आणि मुक्त स्रोत प्रकल्पांमधील सक्रिय सहभागामुळे संस्थेला जागतिक स्तरावर गौरव मिळाला आहे. अथांग काळी या विद्यार्थ्याच्या या दैदिप्यमान यशा बद्दल एस. जी. जी. एस. अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड चे नियमक मंडळाचे अध्यक्ष प्रशांत पौळ, नियमक मंडळाचे सदस्य अमोल महामुनी, बाबा सुखविंदर सिंघजी, संजय लाठकर, सुरेश जोंधळे, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई चे संचालक तथा नियामक मंडळाचे मा. सदस्य डॉ.प्रमोदजी नाईक, प्रा. डॉ विक्रम गद्रे, डॉ. अभिजित नांदेडकर, डॉ. जयश्री वाघमारे तसेच संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. संदीप मुंढे, इलेक्ट्रोनिक्स अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनील जत्ती, सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.



ठाणे : दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्या आदेशानुसार शिळफाटा नाका ते कल्याण फाटा दरम्यान दोन्हीही दिशेकडील पदपथांवर बेकायदेशीर अतिक्रमण केलेले फरीवाले, गॅरेज, टपरी यावर अतिक्रमण विभागाकडून कारवाई करत पदपथ मोकळे करण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### श्रावण मास निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

नवीन नांदेड (स. गांवकरी) : हडको येथील कुबरेश्वर महादेव मंदिर येथे श्रावण मास निमित्ताने महिनाभर महाआरती व त्यानंतर भजनाचा कार्यक्रम दररोज व महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून गोकुळ अष्टमी निमित्ताने जन्म उत्सव,भजन संध्या जय श्री कृष्ण इतर विविध कार्यक्रमाची रूपरेषा श्री कृष्ण जन्म उत्सव निमित्त श्री कृष्ण जन्माष्टमी चे भव्य कृष्ण भजन संध्या ,सालासार भजनी मंडळ कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वस्त मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रावण मास निमित्ताने गोकुळ अष्टमी निमित्ताने स्वरचंद प्रतिष्ठान पंडित लक्ष्मीकांत रवंदे प्रस्तुत 4 सप्टेंबर 26 रोजी सायंकाळी 7.30 वाजता आणि जन्मोत्सव आरती रात्री 12 वाजता व लगेचच छप्पन भोग रात्री 12.10 वाजता तर सोहम संगीत संच कौठा नांदेड यांच्या तर्फे रंगराव शिंदे यांचा भजनाचा कार्यक्रम शुक्रवार 06 सप्टेंबर 26 रविवार,व 07 सप्टेंबर 26 सोमवार सालासर भजनी मंडल नांदेड यांचा भजनाचा कार्यक्रम होणार असून सदरील कार्यक्रम जाज्वल्य हनुमान मंदिर आणि कुबेरेश्वर महादेव मंदिर हडको नांदेड आयोजित करण्यात आले आहे. श्री हनुमान सर्व भक्तगणांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष बजरंग भेंडेकर व उपाध्यक्ष सतिश भेडेंकर व पदाधिकारी यांनी केले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी 'पेन्शन अदालत'

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : शासनाच्या सूचनेनुसार सप्टेंबर २०२६ महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी, दिनांक ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे 'पेन्शन अदालत' आयोजित करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांच्या पेन्शनसंदर्भातील तसेच अन्य अडचणींचे निवारण करण्याच्या उद्देशाने या पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिनांक ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे उपस्थित राहून आपल्या तक्रारींचे निवेदन सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

### इगतपुरी लोहमार्ग पोलिसांची 'खटारा' गाडी चर्चेत; भररस्त्यात गाडी बंद

इगतपुरी (स. गांवकरी) : आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यात विविध कामांना वेग आला असताना, कुंभमेळ्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या इगतपुरी रेल्वे स्थानकातील लोहमार्ग पोलिसांच्या वाहनाची दुरवस्था समोर आली आहे. पोलिसांची गाडीच भररस्त्यात बंद पडल्याने ती सुरू करण्यासाठी चक्क पोलीस ठाण्यात साफसफाईचे काम करणाऱ्या मुलांना धक्का देण्यासाठी बोलवावे लागल्याचा प्रकार घडला. काही मिनिटे गाडीला धक्का दिल्यानंतर वाहन सुरू झाले. मात्र या प्रकारामुळे कुंभमेळ्याच्या काळात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भाविकांची सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी असलेल्या लोहमार्ग पोलिसांच्या वाहन व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर इगतपुरी हे महत्त्वाचे रेल्वे स्थानक ठरण्याची शक्यता आहे. नाशिकपासून जवळ असलेल्या इगतपुरी परिसरात कुंभमेळ्याचे उगमस्थान मानले जाणारे कावनई, तसेच कसारा घाट आणि इगतपुरी रेल्वे स्थानक असा महत्त्वाचा परिसर आहे. कुंभमेळ्याच्या काळात भाविकांची मोठी गर्दी रेल्वेने या भागात येण्याची शक्यता असल्याने रेल्वे स्थानकावरील सुरक्षा, गर्दीचे नियोजन आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी लोहमार्ग पोलिसांवर असणार आहे. अशा परिस्थितीत पोलिसांचे वाहनच रस्त्यात बंद पडत असल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### डाकपालनेच टाकलाय 'डाका'

अकोले (स. गांवकरी) : तालुक्यातील समशेरपुर येथील हंगामी स्वरुपात नियुक्तीस असलेले सहाय्यक शाखा डाकपाल ओंकार गंगाधर तेलंग यांनी ग्राहकांच्या विविध खात्यांची जमा केलेली रक्कम त्यांच्या खात्यात न भरता तब्बल १ लाख ८४ हजारांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत संतोष सुरेश जोशी (वय ५७ वर्ष रा. संगमनेर ता. संगमनेर) यांनी अकोले पोलिसात फिर्याद दिली असून त्यात म्हटले आहे, सहाय्यक शाखा डाकपाल समशेरपूर ओंकार गंगाधर तेलंग (मु. रा. बालाजी नगर पो. लोहा ता जिल्हा नांदेड) हे सावरगाव पाट पोस्ट ऑफिस पोस्टमास्तरच्या रिक्त पदावर हंगामी स्वरुपात दिनांक १ जुन २०२५ ते ७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत शाखाडाकपाल म्हणून काम करीत होते. त्यावेळी फिर्यादी सावरगाव पाट शाखा डाकघरास वार्षिक तपासणीकामी भेट देण्यासाठी गेले असता सावरगाव पाट पोस्ट ऑफिस बंद असल्याचे आणि ओंकार गंगाधर तेलंग हे गैरहजर असल्याचे आढळून आले. चौकशीअंती ओंकार गंगाधर तेलंग हे आजारी असल्याचे समजले. त्यामुळे देवठाण पोस्ट ऑफिसचे सहाय्यक शाखा डाकपाल दत्ता पवार यांच्याकडे सावरगाव पाट पोस्ट ऑफिसचा पदभार देण्याचा निर्णय झाला.

## महात्मा ज्योतिबा फुले पतसंस्थेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

आळे : (स. गांवकरी)




आळे, ता. जुन्नर येथील महात्मा ज्योतिबा फुले ग्रा.बि.शेती सह पतसंस्था मर्या. आळे ची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कोकणे लॉन्स मंगल कार्यालय (लवणवाडी),आळे येथे संस्थेचे चेअरमन मा.श्री.रविंद्र(प्रकाश) शिवाजी वाघोले यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेस संस्थापक श्री. प्रताप कुऱ्हाडे सर, गंगाराम गुंजाळ सर, चंद्रकांत पा. भुजबळ,सल्लागार सहादू शिंदे तसेच उपाध्यक्ष गोपाळ कुऱ्हाडे, सचिव दादासाहेब बहिरट, खजिनदार अमर सहाणे, संचालक सुधीर लाड, रविंद्र गुंजाळ, किशोर कुऱ्हाडे, चारुदास साबळे, शिवाजी कुऱ्हाडे, संचालिका श्रीमती.शैला शिरतर, सौ.सुरेखा भुजबळ व तज्ञ संचालक बाळासाहेब डावखर उपस्थित होते. तसेच गावातील इतर संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर व सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. त्यामध्ये मा.पं.स सदस्य नेताजीदादा डोके, प्रसन्न आण्णा डोके, जिवनशेठ शिंदे, सागरशेठ गुंजाळ, मारुती पाडेकर, सरपंच मुकुंद भंडलकर, सौ.जयश्री डावखर, गणेश गुंजाळ, उदय पा.भुजबळ, रामदासशेठ वाव्हळ, दिगंबर घोडेकर, मिननाथ शिंदे, निलेश शिंदे, गोरक्ष गुंजाळ, गोपीचंद मेहेर, सखाराम कुऱ्हाडे गुरुजी, पुरुषोत्तम साबळे, सावळेराम पाडेकर, जिजाभाऊ गुंजाळ, दिपक कुऱ्हाडे, अजित डोके, उमेश कुऱ्हाडे, अरुण हुलवळे, नागेश कुऱ्हाडे, अविनाश कुऱ्हाडे, म्हतू सहाणे, गेनभाऊ हुलवळे, कान्हू कुऱ्हाडे, संतोष पाडेकर, शिवाजी वाघोले, सुनिल कुऱ्हाडे, गणेश शिंदे, रामचंद्र गुंजाळ, महेंद्र पाडेकर, हर्षद गुंजाळ इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सभेच्या वेळी नव्याने नियुक्ती झालेल्या मान्यवरांचे तसेच गावातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कर्जवसुलीकामी थकीत कर्जदारांनी थकीत रक्कमेचा भरणा करून सहकार्य करावे व कायदेशीर कारवाई टाळावी, जेणेकरून संस्थेचे थकीत कर्जाचे पर्यायाने एन.पी.ए तरतुदीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल असे आवाहन चेअरमन श्री. रविंद्र(प्रकाश) वाघोले यांनी केले. सभेत सभासदांना १५% दराने लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच दीपावली भेटवस्तू सभासदांना मोफत देण्याचाही निर्णय घेण्यात आला. संस्थेचे वसुल भागभांडवल २.३६ कोटी, निधी २.७१ कोटी, स्वनिधी ४.०३ कोटी, खेळते भांडवल ५५.०५ कोटी, गुंतवणूक २०.८८ कोटी, येणे कर्ज- ३१.९७ कोटी, ठेवी- ४२.१९ कोटी, नफा-७०.३६ लाख रु आहे, अशी माहिती चेअरमन श्री. रविंद्र(प्रकाश) वाघोले यांनी दिली.

पतसंस्थेची स्वमालकीची इमारत असून संगणकीकृत कामकाज केले जाते. सोनेतारण कर्ज, लॉकर सुविधा, RTGS सुविधा उपलब्ध आहे. पतसंस्था सामाजिक, धार्मिक कार्यात सहभाग घेऊन मोलाचे कार्य करीत आहे. अशी माहिती पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ह.भ.प श्री.बाळकृष्ण महाराज कुऱ्हाडे यांनी दिली.

## 'दादा'च्या प्रतिमेला राखी बांधून भगिनींची भावपूर्ण आदरांजली

- देहू नगरपंचायतीत रक्षाबंधन विशेष कार्यक्रम
- माजी नगराध्यक्षा पूजा दिवाटे यांचे भावनिक मनोगत

देहूगाव : (स. गांवकरी)

डोळ्यांत अश्रू अन् मनात हजारो आठवणी... अशा भावूक वातावरणात देहू नगरपंचायतीत रक्षाबंधन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचे भाऊ म्हणून जिव्हाळ्याचे स्थान निर्माण केलेले स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतींना यावेळी भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने भगिनींनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला राखी बांधून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी उपस्थित महिलांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. दादांनी महिलांना दिलेला आधार, आत्मविश्वास आणि संकटाच्या काळात पाठीशी उभे राहण्याची दिलेली ग्वाही यावेळी आवर्जून स्मरणात आली.

यावेळी माजी नगराध्यक्षा पूजा दिवाटे म्हणाल्या, "यंदाचे रक्षाबंधन केवळ सण म्हणून साजरे होत नाही; तर आपल्या लाडक्या भावाच्या पवित्र स्मृतींना वाहिलेली ही हृदयस्पर्शी आदरांजली आहे. दादा आज आपल्यात नसले तरी त्यांनी प्रत्येक बहिणीच्या मनात पेटवलेली आत्मविश्वासाची ज्योत कायम तेवत राहील. त्यांच्या आठवणी आणि त्यांनी दिलेली शिकवण प्रत्येक भगिनीला आयुष्यभर प्रेरणा देत राहील."

## डॉ. अनुष्का गट्टूवार यांचे एम्स रायपूरमध्ये उत्तुंग यश

नांदेड : (स. गांवकरी)



नांदेडच्या यश नगरी येथील रहिवासी डॉ. अनुष्का राजेश गट्टूवार यांनी वैद्यकीय शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय आयुर्विज्ञान संस्था (AIIMS), रायपूर, छत्तीसगड येथून उत्कृष्ट गुणांसह एमबीबीएस पदवी प्राप्त केली आहे. विशेष म्हणजे, आज झालेल्या पदवीदान समारंभात भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते डॉ. अनुष्का यांना एमबीबीएस पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. अनुष्का गट्टूवार या मूळच्या कुंडलवाडी,ता.बिलोली, जि. नांदेड येथील असून, त्यांचे वडील राजेश गट्टूवार हे महापारेषणच्या औष्णिक विद्युत केंद्र,पारस, जि. अकोला येथे अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या आई सौ.अलका राजेश गट्टूवार या गृहिणी आहेत. डॉ. अनुष्का यांचे प्राथमिक शिक्षण परळी वैजनाथ येथे, तर शालेय शिक्षण ज्ञानमाता हायस्कूल, नांदेड येथे झाले. शालेय जीवनापासूनच त्या अभ्यासात अत्यंत हुशार असून, विविध परीक्षांमध्ये सातत्याने अव्वल कामगिरी करत आल्या आहेत. एमबीबीएस शिक्षणातही आपल्या गुणवत्तेची आणि मेहनतीची छाप उमटवत त्यांनी उत्कृष्ट यश मिळविले. MBBS पदवी संपादन केल्यानंतर सध्या त्या JIPMER, पुद्दुचेरी येथे वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागातून आलेल्या अनुष्का यांनी आपल्या बुद्धिमत्ता, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रात मिळविलेले हे यश नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आई-वडील, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डॉ. अनुष्का गट्टूवार यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## दोन शिक्षक, तीन विद्यार्थी; तरीही शाळेला कुलूप!

- बरबडा वाडीतील जिल्हा परिषद शाळेचा धक्कादायक प्रकार
- विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा, शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

नायगाव : (स. गांवकरी)



नायगाव तालुक्यातील बरबडा वाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कारभाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शाळेत दोन शिक्षक आणि अवघे तीन विद्यार्थी असताना शाळेच्या इमारतीला कुलूप असल्याचे निदर्शनास आल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शिक्षक नियमितपणे उपस्थित राहत नसल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांनी केला असून, या प्रकाराबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र, बरबडा वाडीतील जिल्हा परिषद शाळेची परिस्थिती या उद्देशालाच हरताळ फासणारी असल्याचा आरोप होत आहे. शाळेत दोन शिक्षक कार्यरत असून केवळ तीन विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. असे असतानाही शाळा बंद अवस्थेत आढळल्याने 'विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यायचे तरी कुठे?' असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. शाळा आहे, शिक्षक आहेत, विद्यार्थीही आहेत; मग कुलूप कशासाठी?

शाळेत विद्यार्थी असताना शाळेच्या इमारतीला कुलूप असल्याचे निदर्शनास आल्याने शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिक्षकांच्या अनुपस्थितीबाबत पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. एका शिक्षकाच्या नांदेड येथे नेमणुकीचा विषय असल्याचे सांगितले जात असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली, तर दुसऱ्या शिक्षकाकडूनही विविध कारणे सांगितली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मात्र, नेमकी वस्तुस्थिती काय, शिक्षकांची उपस्थिती किती आहे आणि शाळेला कुलूप का लावण्यात आले, याबाबत शिक्षण विभागाकडून अधिकृत स्पष्टीकरण मिळणे आवश्यक आहे.

या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी संबंधित केंद्रप्रमुखांशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा फोन बंद असल्याचे आढळून आले. तसेच नायगावचे गटशिक्षणाधिकारी सचिन दर्शनवाड यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे या प्रकाराबाबत शिक्षण विभागाची अधिकृत भूमिका समोर येऊ शकली नाही. शाळेत विद्यार्थी कमी आहेत म्हणून त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. तीन विद्यार्थ्यांसाठी दोन शिक्षक उपलब्ध असतानाही शाळेला कुलूप लागणे ही बाब गंभीर असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची जबाबदारी शिक्षण विभागाने निश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

### चौकशी करून कारवाईची मागणी

गरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असल्याने शिक्षण विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन शाळेची प्रत्यक्ष पाहणी करावी, शिक्षकांच्या उपस्थितीची तपासणी करावी आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे.

## केदारनाथच्या भक्तांना रस्त्यांवरची कसरत

- मनाठा ते तामसा-तळेगाव मार्गावरील रस्त्याची अक्षरशः चाळणी
- श्रावण महिन्यात हजारो भाविकांना नाहक त्रास

तामसा : (स. गांवकरी)



तालुक्यातील प्रसिद्ध हेमाडपंथी महादेव मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केदारगुडा येथील केदारनाथ महादेवाच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यात हजारो भाविकांची गर्दी होत असताना, मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था भाविकांच्या श्रद्धेच्या मार्गात अडथळा ठरत आहे. मनाठा मार्गे येणारा सुमारे दोन किलोमीटर तसेच तामसा-तळेगाव मार्गे येणारा सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता अक्षरशः खड्डेमय झाल्याने भाविकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे.विशेष म्हणजे, याच मार्गावरील बहुतांश रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चांगल्या स्थितीत करण्यात आला असताना केवळ दोन ते चार किलोमीटरचा रस्ता दुरुस्तीपासून वंचित का ठेवण्यात आला, असा संतप्त सवाल भाविकांकडून उपस्थित केला जात आहे. या थोड्याशा अंतरासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधीची कमतरता आहे का? की या रस्त्याच्या कामासाठी प्रशासकीय पातळीवरच उदासीनता आहे, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत. मनाठा ते तामसा मार्गे तळेगाव पाटीपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून रस्त्याचे बांधकाम तसेच पुलाचे काम काही दिवसांपूर्वी पूर्ण करण्यात आले. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुरळीत होऊन केदारगुडा येथील महादेव मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.मात्र, प्रत्यक्षात या मार्गावरील केवळ दोन ते तीन किलोमीटरचा महत्त्वाचा भाग अद्याप पूर्ण करण्यात आलेला नाही. त्यामुळे चांगला रस्ता संपल्यानंतर अचानक खड्ड्यांचा आणि दगडधोंड्यांचा सामना भाविकांना करावा लागत आहे. परिणामी, संपूर्ण रस्ता व्यवस्थित असूनही केवळ काही किलोमीटरच्या दुरवस्थेमुळे भाविकांचा हिरमोड होत आहे.'प्रशासकीय काम, पण बारा महिने थांब....!' अशी उपरोधिक चर्चा सध्या परिसरात रंगली असून, संबंधित विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे. श्रावणात भाविकांची मोठी गर्दी केदारगुडा येथील हेमाडपंथी महादेव मंदिराला परिसरातील भाविकांमध्ये विशेष धार्मिक महत्त्व आहे. श्रावण महिन्यात विविध गावांतून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येथे येतात. अनेक भाविक खासगी वाहने, दुचाकी, चारचाकी तसेच विविध वाहनांतून मंदिराकडे जातात.मात्र, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना वाहन सांभाळताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.

### मान्यवर लोकप्रतिनिधींनी वैयक्तिक लक्ष द्यावे

या भागाचे माजी खासदार सुभाषराव वानखेडे, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, विद्यमान खासदार नागेश पाटील आष्टीकर,तसेच विद्यमान आमदार बाबुराव कदम कोहळीकर हे केदारनाथ येथील महादेवावर श्रद्धा ठेवणारे लोकप्रतिनिधी म्हणून परिचित आहेत. या मार्गावर त्यांचा नेहमीच प्रवास होत असल्याने रस्त्याची सद्यस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांनी या प्रश्नात वैयक्तिक लक्ष घालावे. हजारो भाविकांची गैरसोय लक्षात घेऊन संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून केदारगुडा देवस्थानाकडे जाणारा रस्ता सुकर करून द्यावा, अशी मागणी आता परिसरातील भाविक भक्तांमधून जोर धरू लागली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २६० । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
॥ जय भगवान ॥
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
मा.नानजीभाई खेमजीभाई ठक्कर
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!
बातम्या, जाहिराती व सदस्यता साठी संपर्क साधा.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासार्ह सेवा वेळेत काम
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

गुरुवार दि. ०३ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## महाराष्ट्रात आरोग्यसेवेत मोठा बदल, रुग्णालयांना मिळणार स्टार रेटिंग; मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय

मुंबई (समर्थ गांवकरी)

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांच्या स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी शुभारंभ करण्यात आला. राज्यातील आरोग्यविषयक माहितीचे केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी व्हावा. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने काम करावे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्री उपक्रमांचे कौतुक केले.

डेटावर आधारित निर्णयांसाठी एकात्मिक डॅशबोर्ड

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कार्यक्रमांसाठी सध्या ४० हून अधिक स्वतंत्र पोर्टल कार्यरत आहेत. या पोर्टलवरील महत्त्वाची माहिती एकत्रित करून एकाच व्यासपीठावर उपलब्ध करण्यासाठी एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड विकसित करण्यात आला आहे. माता व बाल आरोग्य, क्षयरोग नियंत्रण, असंसर्गजन्य आजारांची तपासणी आदी कार्यक्रमांशी संबंधित प्रमुख निर्देशांकांचे राज्य तसेच जिल्हानिहाय विश्लेषण या डॅशबोर्डवर करता येणार आहे. यामुळे आरोग्यविषयक आव्हाने तातडीने ओळखणे, जिल्हानिहाय कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि आवश्यक ठिकाणी परिणामकारक उपाययोजना करणे अधिक सुलभ होणार आहे. आरोग्यविषयक माहितीचे रूपांतर कृतीयोग्य डेटामध्ये होऊन प्रशासकीय निर्णय अधिक अचूक आणि गतिमान होणार आहेत.

नागरिकांशी थेट संवादासाठी एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र

एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्राच्या माध्यमातून '१०४' कॉल सेंटरचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. नागरिकांकडून येणाऱ्या दूरध्वनींसह आरोग्य विभागाकडून करण्यात येणाऱ्या संपर्क कॉल्सचेही नियोजन या केंद्रातून होणार आहे. अतिजोखमीच्या गर्भवती माता, प्रसूतीनंतरच्या माता, क्षयरुग्ण तसेच असंसर्गजन्य आजारांशी संबंधित नागरिकांचा पाठपुरावा करण्याबरोबरच रुग्णालयातील सेवांविषयी नागरिकांचे अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत. या केंद्रात दैनंदिन सुमारे एक हजार कॉल्स हाताळण्याची व्यवस्था असून त्यासाठी प्रशिक्षित ऑपरेटर्स कार्यरत राहणार आहेत. गंभीर अथवा तातडीच्या प्रकरणांची माहिती संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना तत्काळ कळविण्याची यंत्रणाही विकसित करण्यात आली आहे.

आरोग्य संस्थांच्या गुणवत्तावाढीसाठी स्टार रेटिंग

राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध होणाऱ्या सेवांचे प्रमाणीकरण आणि गुणवत्तावाढ करण्यासाठी स्टार रेटिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. विशेष सेवांची उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, औषधांचा पुरवठा, प्रयोगशाळा सेवा, बाह्यरुग्ण व आंतररुग्ण



सेवा, प्रसूती व शस्त्रक्रियांची संख्या, स्वच्छता, सुविधांची उपयुक्तता आणि रुग्णांचे अभिप्राय अशा विविध निकषांवर आरोग्य संस्थांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे नागरिकांना रुग्णालयांमध्ये उपलब्ध सेवांची सर्वसमावेशक माहिती घरबसल्या मिळेल. शिवाय या व्यवस्थेत नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीवर आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर तातडीने कार्यवाही करण्याची तसेच त्यानंतर नागरिकांशी संपर्क साधून सेवा मिळाल्याची खात्री करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सेवा दिली का यासोबतच सेवा मिळाली का यावरही लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

## एनएमआयएवर जगातील बलाढ्य मालवाहू विमानाचे आगमन

### ४६ टन माल घेऊन आले 'अँटोनोव्ह एएन-१२४ रुस्लान'

नवी मुंबई (समर्थ गांवकरी)

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर (NMI) जगातील सर्वात मोठ्या मालवाहू विमानांपैकी एक असलेल्या अँटोनोव्ह एएन-१२४ रुस्लानचे आगमन झाले. अबुधाबीहून तब्बल ४६ टन माल घेऊन हे महाकाय विमान नवी मुंबईत दाखल झाले.

अवजड मालवाहतुकीसाठी विशेष ओळख : अँटोनोव्ह एएन-१२४ रुस्लान हे मोठ्या आकाराच्या आणि अवजड मालाची वाहतूक करण्यासाठी विशेष प्रसिद्ध असलेले मालवाहू विमान आहे. या विमानाची रचना अत्यंत मोठ्या आणि वजनदार वस्तूंची वाहतूक लक्षात घेऊन करण्यात आली आहे. विमानाच्या वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे त्याचा पुढील भाग उघडता येतो. त्यामुळे नेहमीच्या मालवाहू विमानांमध्ये सहजपणे बसू न शकणारा मोठ्या आकाराचा मालही विमानात चढवणे आणि उतरवणे तुलनेने सोपे होते.

एनएमआयएच्या क्षमतेचे प्रदर्शन : या महाकाय विमानाच्या आगमनामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची मोठी आणि विशेष मालवाहू विमाने हाताळण्याची क्षमता अधोरेखित झाली आहे. अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि मालवाहतूक व्यवस्थेमुळे एनएमआयए भविष्यात आंतरराष्ट्रीय कार्गो वाहतुकीसाठी महत्त्वाचे केंद्र बनण्याच्या दिशेने पुढे जात असल्याचे या घटनेतून दिसून येते.

## संक्षिप्त

### महाराष्ट्र सरकारचा ऑस्ट्रेलियातील 'न्यू साउथ वेल्स'सोबत सामंजस्य करार

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्स यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक व्यापक आणि परिणामाभिमुख करण्याच्या दिशेने बुधवारी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि न्यू साउथ वेल्सचे प्रमुख क्रिस मिन्स यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्षा शासकीय निवासस्थानी वित्तीय सेवा, स्वच्छ ऊर्जा, प्रगत उत्पादन, कृषी तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांत सहकार्य करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक राज्य बनवण्याच्या उद्दिष्टाशी हा करार सुसंगत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी स्पष्ट केले.

### ब्रिक्स परिषदेसाठी गुटेरेस भारतात येणार;

#### पुतिन, पेजेशकियन आणि जिनपिंगही येण्याची शक्यता

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

भारताच्या यजमानपदाखाली होणाऱ्या १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेत संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेसही सहभागी होणार आहेत. ही परिषद १२ आणि १३ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित करण्यात येणार आहे. यावर्षी भारत ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवत आहे. संयुक्त राष्ट्र महासचिवांचे प्रवक्ते स्टीफन दुजारिक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, गुटेरेस यांच्या परिषदेत सहभागी होण्याची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. मात्र, त्यांनी संकेत दिले की, संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख सुमारे १० दिवसांनंतर नवी दिल्ली येथे होणाऱ्या ब्रिक्स बैठकीत सहभागी होतील. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांचा यावर्षीचा हा भारताचा दुसरा महत्त्वपूर्ण दौरा असेल. फेब्रुवारी २०२६ मध्ये ते नवी दिल्ली येथे आयोजित इंडिया-एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये सहभागी झाले होते. ग्लोबल साउथमध्ये आयोजित करण्यात आलेली ही पहिली जागतिक एआय शिखर परिषद होती.

### केदारनाथ हेलिकॉप्टर सेवेसाठी ७ सप्टेंबरपासून बुकिंग विंडो उघडणार

डेहराडून (समर्थ गांवकरी)

चारधाम यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यात केदारनाथ धामला जाणाऱ्या भाविकांसाठी हेलिकॉप्टर सेवा १५ सप्टेंबरपासून पुन्हा सुरू होणार आहे. उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाने (यूसीएडीए) यासाठी तयारी वेगाने सुरू केली असून, पहिली तिकीट बुकिंग विंडो ७ सप्टेंबरपासून उघडण्याची तयारी आहे.

यूसीएडीएच्या माहितीनुसार, तिकिटांचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि बुकिंग व्यवस्था सुव्यवस्थित करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात १५-१५ दिवसांच्या कालावधीसाठी टप्प्याटप्प्याने तिकिटे उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

### निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ नियुक्त

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

प्रशासकीय कामकाज अधिक मजबूत आणि सुव्यवस्थित करण्यासाठी, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची आपल्या पहिल्या पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदावर नियुक्ती केली आहे. मंदिर व्यवस्थापनाला बळकटी देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

प्रशासकीय सुधारणा आणि पार्श्वभूमी

नुकत्याच समोर आलेल्या निधी व्यवस्थापनाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टने आपले प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक आणि मजबूत करण्याचे ठरवले आहे.

## डिंभे-माणिकडोह बोगद्याला विरोध कायम असून शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही : दिलीप वळसे पाटील

मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील डिंभे-माणिकडोह बोगद्याला विरोध कायम असून शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही. बोगद्याला विरोधासाठी शेतकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत. असा इशारा देणारे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई येथे मंगळवारी देण्यात आले. अशी माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

कुकडी प्रकल्पाच्या ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये डिंभे-माणिकडोह बोगद्याचा समावेश करण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर आंबेगाव, शिरूर व जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या बोगद्याला विरोध कायम असल्याची ठाम भूमिका माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी घेतली आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती मिळताच वळसे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बोगद्यामुळे या परिसरातील शेतीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भूमिका मांडली. तसेच १८ जुलै २०२४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत



डिंभे-माणिकडोह बोगद्यामुळे आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या हक्कावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बोगद्याला आमचा ठाम विरोध असून, शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय सहन केला जाणार नाही. दिलीप वळसे पाटील माजी गृहमंत्री.

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत डिंभे-माणिकडोह बोगदा न करण्याबाबत दिलेल्या आश्वासनाचीही त्यांनी मुख्यमंत्र्यांना आठवण करून दिली.

यावेळी वळसे पाटील यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयामध्ये आवश्यक बदल करण्याची मागणी करत निवेदन मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष दिले.

## लौकी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काळे गटाच्या सौ. दीपाली खटकाळे यांची निवड

कोपरगांव (समर्थ गांवकरी)

कोपरगाव तालुक्यातील लौकी ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच किरण शेळके यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी नुकतीच निवडणूक प्रक्रिया पार पडली. पार पडलेल्या या निवडणुकीत काळे गटाच्या सौ.दिपाली विष्णू खटकाळे यांचा विजय होऊन त्यांची उपसरपंच पदी निवड झाली आहे.

लौकी ग्रामपंचायतीच्या रिक्त उपसरपंचपदासाठीची निवडणूक प्रक्रिया सरपंच आजिनाथ खटकाळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. उपसरपंचपदासाठीच्या निवडणुकीत काळे गटाकडून सौ.दिपाली विष्णू खटकाळे व कोल्हे गटाकडून भीमाबाई बाबासाहेब खटकाळे यांचे अर्ज दाखल होवून पार पडलेल्या निवडणुकीत दोन्ही उमेदवारांना समसमान चार मते पडली असता. सरपंचाचे निर्णायक मत सौ.दिपाली विष्णू खटकाळे यांच्या पारड्यात पडल्यामुळे निवडणूक अधिकारी काम पाहत असलेले ग्रामसेवक संकेत शिंगाडे यांनी सौ.दिपाली खटकाळे यांचा विजय झाल्याचे जाहीर केले.

आपल्या विजयाबद्दल प्रतिक्रिया देतांना सौ. दिपाली खटकाळे म्हणाल्या की, अटीतटीच्या उपसरपंच पदाच्या



निवडणुकीत मिळालेल्या विजयाचा आनंद निश्चितपणे मोठा असला तरी उपसरपंचपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवून आ.आशुतोष काळे यांनी माझ्यावर जो विश्वास व्यक्त केला आहे, तो माझ्यासाठी केवळ पदाची संधी नसून काम करण्याची मोठी जबाबदारी आहे. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्तीवर विश्वास दाखवून उपसरपंचपदावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल आ.आशुतोष काळे यांची मी मनापासून ऋणी आहे. काळे कुटुंबीयांनी आणि आ. आशुतोष काळे यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास हीच माझी कामाची प्रेरणा राहील. या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने लौकी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. गावकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करून माझ्यावर सोपविलेली जबाबदारी सार्थ ठरविण्यासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करेन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पुणे - नाशिक रेल्वेसाठी लढा निर्णायक टप्प्यात : आमदार सत्यजीत तांबे

### तांत्रिक बाबींसह जनभावनाही तपासण्याची मागणी

संगमनेर (समर्थ गांवकरी)

पुणे - नाशिक रेल्वेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष आता अंतिम टप्प्यात आला असून, मार्ग बदलण्याच्या चर्चेला सुरुवात झाल्यापासून गेल्या दोन वर्षांत लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आपण मोठ्या प्रमाणावर लढा उभारला आहे. त्याचा परिणाम म्हणून केंद्र व राज्य सरकारने या प्रश्नाच्या तांत्रिक बाबी तपासण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन केली असून, समितीने ६० दिवसांत निर्णय द्यावा, अशी आपली ठाम मागणी असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी सांगितले.

माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, फेब्रुवारीतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपण पुणे - नाशिक रेल्वेचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ.अनिल काकोडकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ समिती स्थापन करून नारायणगाव परिसरातील जीएमआरटीच्या प्रकल्पाचा रेल्वेमार्गावर नेमका किती परिणाम होतो, यासह तांत्रिक बाबी

**६० दिवसांपैकी २५ दिवस संपले; समितीने नेमके केले काय ?**

काकोडकर समिती स्थापन होऊन जवळपास २५ दिवस झाले आहेत. समितीला ६० दिवसांची मुदत दिली असताना त्यातील २५ दिवस संपले; मात्र अद्याप कोणत्याही हालचाली दिसत नाहीत. आम्ही डॉ. अनिल काकोडकर यांच्याशी संपर्क साधला असता, 'शासनाने अद्याप मला कळवलेच नाही,' असे त्यांनी सांगितले. एवढी दिरंगाई होत असेल, तर ही बाब जनतेसमोर आली पाहिजे.

**- आमदार सत्यजीत तांबे**

तपासल्या जातील, असे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर चार-पाच महिने समिती स्थापन न झाल्याने ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने आंदोलनाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर ६ ऑगस्ट रोजीच राज्य शासनाने काकोडकर समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय काढला. या समितीत अनिल काकोडकर यांच्यासह रेल्वे बोर्डाचे अधिकारी तसेच पुणे व नाशिक विभागाचे आयुक्तांचा समावेश आहे.

९ ऑगस्टच्या आंदोलनात समितीला ६० दिवसांचीच मुदत द्यावी आणि त्यापेक्षा मुदतवाढ देऊ नये, तसेच केवळ तांत्रिक बाबींचा विचार न करता स्थानिक नागरिकांच्या भावना जाणून घेण्यासाठी जनसुनावणी





घ्यावी, अशा दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या. या दोन्ही मागण्या सरकारने मान्य करून त्याबाबत लेखी आश्वासन दिल्याचे तांबे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केंद्र सरकारकडून पुणे - नाशिक रेल्वे रद्द झाल्याचे यापूर्वी जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर शिर्डी-अहिल्यानगर मार्गे रेल्वे नेण्यासंदर्भातील गॅझेट प्रसिद्ध झाल्याने पुणे-नाशिक रेल्वेचा मार्ग बदलल्याच्या बातम्या समोर आल्या. मात्र, काकोडकर समिती आता स्थापन झाली असून, तिच्या अहवालाची आपण प्रतीक्षा करीत आहोत. पुणे - नाशिक रेल्वेचा पूर्वीचा मार्ग कायम राहावा, ही आपली प्रमुख मागणी आहे. मात्र, नाशिक - शिर्डी तसेच अहिल्यानगर - पुणे हे रेल्वेमार्ग करण्यास आपला विरोध नाही. हे मार्ग अधिक थेट झाल्यास प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. परंतु, हे नवीन मार्ग करताना अनेक वर्षांपासूनची पुणे-नाशिक रेल्वेची मागणी बाजूला सारण्याचा प्रयत्न सरकारने करू नये, अशी आमची माफक अपेक्षा आहे, काकोडकर समिती स्थापन होण्यापूर्वीच्या निर्णयाच्या आधारे आलेल्या बातम्यांमुळे संभ्रम निर्माण झाला आहे.

आता समिती स्थापन झाली असून तिला ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे सरकारवर विश्वास ठेवून समितीच्या निर्णयाची प्रतीक्षा करू आणि पुणे-नाशिक रेल्वेसाठीचा संघर्ष पुढेही सुरू ठेवू, असेही आमदार सत्यजीत तांबे यांनी स्पष्ट केले.

# नेवाशात उबाठा शिवसेनेची 'वज्रमूठ'; निष्ठावंत शिवसैनिकांच्या बळावर संघटना मजबूत करण्याचा निर्धार!

## जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांच्या उपस्थितीत शेकडो शिवसैनिकांची बैठक



**नेवासा (समर्थ गांवकरी)**

सच्चा शिवसैनिक कुठेही गेलेला नाही, तो आजही उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वास व्यक्त करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने नेवासा तालुक्यात संघटनात्मक बांधणीला वेग देण्याचा निर्धार केला. उत्तर जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील व जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा येथे झालेल्या बैठकीला निष्ठावंत शिवसैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नेवासा येथील शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार यांच्या निवासस्थानी असलेल्या अतिथी सभागृहात ही बैठक झाली. बैठकीत आगामी काळात निष्ठावंत शिवसैनिकांना नव्याने उभारी देऊन नेवासा तालुक्यातील प्रत्येक गावात संघटनेची पाळेमुळे मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी उत्तर जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील, जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी, जिल्हा संघटक अमोल बो–हाडे, ज्येष्ठ शिवसैनिक मालोजीराव गटकळ, राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, तालुकाप्रमुख मच्छिंद्र म्हस्के पाटील, तालुका उपप्रमुख मन्ना चक्रनारायण, सारंग फोफसे पाटील, युवा नेते नारायण लष्करे, अशोक उपळकर, माजी शहरप्रमुख अंबादास लष्करे, बाबासाहेब गोल्हार, माजी उपसरपंच गोरख घुले पाटील, राहता तालुकाप्रमुख संदीप विघे, कैलास लष्करे आदी उपस्थित होते. शिवसेनेचे कट्टर शिवसैनिक बिट्टूभाऊ लष्करे यांची या बैठकीला विशेष उपस्थिती होती.

....'गाव तेथे शाखाप्रमुख'चा नारा....

बैठकीच्या सुरुवातीस बालेंद्र पोतदार व युवा शिवसैनिक अथर्व पोतदार यांनी उपस्थित शिवसैनिकांचे स्वागत केले. तालुकाप्रमुख मच्छिंद्र म्हस्के पाटील यांनी प्रास्ताविक करताना संघटन मजबूत करण्यासाठी सर्व निष्ठावंत शिवसैनिकांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास असलेले सच्चे शिवसैनिक आजही आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यांना एकत्रित करून नेवासा तालुक्यात शिवसेना पुन्हा जोमाने उभी करू. नागरिकांच्या ज्वलंत व जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची तयारी ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

शिवसैनिक जागेवरच; फक्त संघटन मजबूत करा – ––जगदीश चौधरी

जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी यांनी निष्ठावंत शिवसैनिकांच्या भूमिकेचे कौतुक करताना सांगितले की, सामान्य शिवसैनिक जागेवरच आहे. नेवासा तालुक्यातील शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. तालुक्यात कार्यकारिणीची पुनर्बांधणी करून पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्यात.'गाव तेथे शाखाप्रमुख' या संकल्पनेतून संघटनेची ताकद वाढवा; तुम्ही सुचवाल त्या पद्धतीने नियुक्त्यांना सहकार्य करू, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

जिल्ह्यात शिवसेनेची ताकद पुन्हा उभी करू – सचिन कोते पाटील

उत्तर जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील म्हणाले की ठाकरे गट फुटल्याचे चित्र निर्माण केले गेले असले तरी सच्चा शिवसैनिक आजही उद्धव ठाकरे यांच्या सोबतच आहे. जिल्ह्यातील सर्व निष्ठावंत शिवसैनिकांना एकत्रित करून त्यांच्या पाठीशी संघटनेची ताकद उभी करू.

आगामी काळात जिल्ह्यात अधिकाधिक आमदार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक निवडून येतील, अशा पद्धतीचे मजबूत संघटन उभे करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.पक्षात येऊन पदे मिळवल्यानंतर पक्ष सोडणाऱ्यांवरही त्यांनी जोरदार टीका केली. शिवसैनिकांची ताकद काय असते, हे त्यांना दाखवून देऊ, असा इशारा देत जिल्ह्यात शिवसेना मजबूत करण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा; शिवसैनिकांच्या खांद्याला खांदा लावून त्यांना बळ देण्याचे काम आपण करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

...एकतेची वज्रमूठ बांधण्याचे आवाहन....

यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक मालोजीराव गटकळ, बालेंद्र पोतदार, गोरखभाऊ घुले पाटील, गंगाधर पवार, नारायण लष्करे, मुन्ना चक्रनारायण, बालू जिरे, राजेंद्र राऊत, युवा सेनेचे कैलास लष्करे, यश गवळी व इंजिनिअर अथर्व पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले.

....मतभेद बाजूला ठेवून एकतेची वज्रमूठ बांधा,... शिवसैनिकांना नव्याने उभारी द्या आणि गावागावात भगवा मजबूत करा, असा सूर यावेळी उमटला. संघटना मजबूत करण्यासाठी आपण सर्वजण खंबीरपणे पाठीशी राहू, असा विश्वासही उपस्थितांनी व्यक्त केला.

# लेखी आश्वासनानंतर खासदार नीलेश लंके यांचे उपोषण मागे

## शिक्षक पदभरती, अशैक्षणिक कामांचा भार व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीबाबत प्रशासनाची कार्यवाही, शासनाकडे प्रस्ताव सादर

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरणे, शिक्षकांवरील वाढता अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे आणि विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबविणे या मागण्यांसाठी खासदार नीलेश लंके यांनी सुरू केलेले उपोषण मंगळवारी उशिरा मागे घेतले. माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर तसेच शासनस्तरावरील मागण्यांबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

खासदार लंके यांनी १ सप्टेंबरपासून अहिल्यानगर जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. जिल्ह्यात शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दा त्यांनी आंदोलनातून उपस्थित केला होता. तसेच कार्यरत शिक्षकांवर विविध अशैक्षणिक कामांचा वाढता भार टाकला जात असल्याने अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची भूमिका त्यांनी मांडली होती.

जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या माध्यमिक शाखेने दिलेल्या लेखी माहितीनुसार, जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील रिक्त शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलमार्फत सुरू आहे. सन २०२६ मधील भरती प्रक्रियेत जिल्ह्यातील १५१ संस्थांच्या एकूण ९६३ पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात विनामुलाखत प्रक्रियेद्वारे १४ संस्थांमधील ३३१ रिक्त पदांसाठी २७० उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. उर्वरित ६१२ पदांसाठी मुलाखतीसह निवड प्रक्रिया पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यातील सुमारे १९४ संस्थांनी अद्याप पवित्र पोर्टलवर जाहिराती प्रसिद्ध केलेल्या नाहीत. तसेच ३० अल्पसंख्याक संस्थांमधील रिक्त पदे व भरती प्रक्रियेबाबत आढावा घेऊन पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येणार आहे. नियमित शिक्षकांच्या जागी अन्य शिक्षकांकडून अध्यापन करून घेतले जात आहे का, याचीही क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करण्यात येणार असून आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाने कळविले आहे.

शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनासाठीचा वेळ आणि अशैक्षणिक कामांमध्ये जाणारा वेळ याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास करण्यात येणार असून स्तंभालेखासह सविस्तर माहिती पुढील आठ दिवसांत खासदार लंके यांना देण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे. प्राथमिक शिक्षण विभागानेही खासदार लंके यांच्या निवेदनातील जिल्हा परिषद स्तरावरील मागण्यांवर कार्यवाही सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच शाळानिहाय गुणवत्ताविषयक स्तंभालेख आठ दिवसांत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. खासदार लंके यांच्या उपोषणातील शासनस्तरावरील प्रमुख मागण्यांबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत एफएसएसएआय नोंदणी मुख्याध्यापकांच्या नावाने न करता अन्न शिजविणाऱ्या यंत्रणा अथवा स्वयंपाकी यांच्या नावाने करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करून ते किमान ७ हजार ५०० रुपयांपेक्षा अधिक करण्यात यावे, तसेच काम केलेल्या संपूर्ण कालावधीचे मानधन देण्यात यावे, अशीही मागणी प्रस्तावात करण्यात आली आहे.



आधार कार्डाअभावी विद्यार्थ्यांच्या प्रवेशात अडचणी येत असल्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे. शिक्षकांना अध्यापनाशी थेट संबंध नसलेल्या अशैक्षणिक कामांपासून मुक्त करून त्यांचा जास्तीत जास्त वेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून द्यावा, हा खासदार लंके यांच्या आंदोलनातील महत्त्वाचा मुद्दा शासनाकडे पाठविण्यात आला आहे. अत्यावश्यक शासकीय कामांसाठी शिक्षकांची नियुक्ती करावी लागल्यास विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होणार नाही, अशी पर्यायी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आणि मागण्या शासनस्तरावर पाठविण्यात आल्याने खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी उशिरा उपोषण मागे घेतले. मात्र, शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न सुटेपर्यंत आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक उपाययोजना होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याची भूमिका त्यांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक-महाविद्यालय समन्वय महत्त्वाचा : डॉ. बी. एम. लोंढे

## विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

आजचे युग हे डिजिटल व तंत्रज्ञानाचे युग असून शिक्षण पद्धतीतही मोठा अमुलाग्र बदल होत आहे. हा नवीन बदल स्वीकारत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि महाविद्यालय यांचा समन्वय महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन अमृतवाहिनी एम बी ए महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी.एम लोंढे यांनी केले आहे.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी एम.बी.ए. महाविद्यालयात प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रथम वर्षीय विद्याथ्यर्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. बी. एम. लोंढे म्हणाले कि, लोकनेते बाळासाहेब थोरात, आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने नेत्र दीपक अशी प्रगती साधली आहे. गुणवत्ता म्हणजे अमृतवाहिनी असे नाव देशपातळीवर झळकले आहे. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालय या तिन्ही घटकांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो . विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक व प्रशिक्षणात्मक सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा. पालकांनीही आपल्या पाल्याच्या अभ्यासाबरोबरच त्यांची मानसिकता, आवडी–निवडी, कौशल्ये आणि भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत सकारात्मक संवाद साधावा. पालक आणि महाविद्यालय यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व परस्पर सहकार्य राहिल्यास विद्यार्थ्यांच्या प्रगतीला निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'कला' म्हणजे मानवाचा सुप्त गुण असून त्याचे प्रकटीकरण होणे आवश्यक : गायिका माधुरी गुंजाळ

## ॲड एम.एन. देशमुख महाविद्यालयात कला मंडळाचे उद्घाटन संपन्न

**राजूर (समर्थ गांवकरी)**

कला हा मानवाचा उपजत गुण आहे, ती एक मानवाची सुप्त अवस्था आहे आणि तिचे सादरीकरण करणे समाजापर्यंत पोहोचविणे हे प्रत्येकाचे अंगभूत कौशल्य आहे असे प्रतिपादन जेष्ठ गायिका आणि सरगमप आर्केस्ट्रा फेम कलाकार माधुरी गुंजाळ यांनी केले .त्या सत्यनिकेतन संस्थेच्या ड.एम. एन देशमुख महाविद्यालय, राजुर ता.अकोले येथील कला मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमुख हे उपस्थित होते.यावेळी त्यांनी आपल्या मधुर वाणीने अनेक चित्रपट गीते, कोळी गिते,लोकगीते आणि प्रेम गीते अशा बहारदार कार्यक्रमांचे सादरीकरण केले.रसिक श्रोते आणि विद्यार्थ्यांनीही त्यांना भरभरून साथ दिली. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. वाय देशमुख म्हणाले की,' कलाकारांचा आदर्श घेऊन आपल्यातील कलेला समृद्ध करण्याची आवश्यकता आहे. कलाकारांच्या सादरीकरना बरोबरच दिलेली दाद व प्रेम देणारे सुद्धा एक कलाकारच आहेत. त्यामुळे कलेची

जोपासना होणे आवश्यक आहे.' या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कला मंडळाचे अध्यक्ष प्रा.थोरात बी.के यांनी केले .सूत्रसंचालन प्रा.प्राची कोंडार यांनी केले तर आभार प्रा. श्रद्धा बगाड यांनी केले.



# जामखेडमधील धक्कादायक प्रकार: जात पंचायतीच्या नावाखाली ५ लाखांची मागणी फेटाळल्याने कुटुंबाला बेदम मारहाण; सहा जणांवर गुन्हा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यातील आराळे वस्ती येथे मी जात पंचायतीचा पंच आहे. मला तुमच्या मुलीच्या लग्नाचे पाच लाख रुपये द्यावे लागतील या मागणीवरून एका कुटुंबाला लोखंडी गज व दगडाने मारहाण करण्यात आली. या घटनेत चार जण जखमी झाले आसुन दोन जणांवर अहिल्यानगर येथिल जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी बाबू तात्या शिंदे (वय ४९, रा. आराळे वस्ती, ता. जामखेड) यांनी जामखेड पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे.

पोलीसांना कडुन मिळालेल्या माहितीनुसार दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ६.३० वाजता फीर्यादी बाबू शिंदे हे आराळे वस्ती, जामखेड येथे आपल्या घरासमोर असताना आरोपी वसंत तात्या लोखंडे, किरण वसंत लोखंडे, अक्षय वसंत लोखंडे, बाजीराव



यलाप्पा लोखंडे, विलास यलाप्पा लोखंडे आणि सुनीता लक्ष्मण तासरजोगे हे सहा जण तेथे आले.

यावेळी वसंत तात्या लोखंडे यांनी आपण जातपंचायतीचा पंच असल्याचे सांगत, मुलीच्या लग्नाचे पाच लाख रुपये दिले नसल्याचे सांगून ते पैसे देण्याची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने त्या ठिकाणी वाद वाढला. यानंतर किरण वसंत लोखंडे याने हातातील लोखंडी गजाने बाबू शिंदे यांच्या डोक्यात मारून जखमी केले, तसेच बाजीराव यलाप्पा लोखंडे याने लाकडी दांडक्याने त्यांच्या पाठीवर व पोटावर मारहाण केली. फीर्यादी यांचा पुतण्या सागर बापु शिंदे याच्या डोक्यात लोखंडी गज मारुन गंभीर जखमी केले. आरोपी एवढ्यावरच थांबले नसुन फीर्यादी यांची पत्नी व भावजय यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत एकुण चार जण जखमी झाले आसुन फीर्यादी बाबू तात्या शिंदे व सागर बापु शिंदे या दोघांवर अहिल्यानगर येथिल जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर फीर्यादी बाबू तात्या शिंदे यांनी पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीनुसार एकुण सहा जणांवर जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाच लाख रुपयांच्या मागणीवरून झालेल्या मारहाण व धमकीच्या या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ संजय लोखंडे हे करित आहेत.

# चिकणी येथील डॉ. सचिन वर्पे यांना गणित विषयात पीएच.डी. प्रदान; आई–वडिलांच्या संघर्षाला दिले यशाचे श्रेय!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

चिकणी (ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी आणि सध्या पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (PCET) पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (PCCOER), रावेत, पुणे येथे गणित विभागात गेली १० वर्षे असिस्टंट प्रोफेसर म्हणून कार्यरत असणारे सचिन लक्ष्मण वर्पे यांना नाशिक येथील संदीप युनिव्हर्सिटीकडून गणित (Mathematics) या विषयात नुकतीच पीएच.डी. (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी आपला शोधनिबंध गणितातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा 'Volterra Integral Equations' (व्होल्टेरा इंटिग्रल इक्वेशन्स) या विषयावर सादर केला.

या अभूतपूर्व यशाचे श्रेय देताना डॉ. सचिन वर्पे यांनी आपल्या आई–वडिलांच्या खडतर संघर्षाचे भावूकपणे स्मरण केले. त्यांच्या वडिलांनी लहानपणापासून अत्यंत विपरीत परिस्थितीत संघर्ष करत, कधीही हार न मानता आपल्या सर्व मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण दिले. त्यांच्या या जिद्दीमुळे आणि अथांग त्यागामुळेच आज सर्व मुले जीवनात व्यवस्थितरीत्या स्थिरावली असून, आता त्यांचे आई–वडील स्वतःही एक आनंदी व समाधानी जीवन जगत आहेत. आई–वडिलांच्या या अमूल्य योगदानाबद्दल डॉ. वर्पे यांनी अत्यंत कृतज्ञता व्यक्त केली आहे.

तसेच, आपल्या या प्रवासाबद्दल बोलताना डॉ. सचिन वर्पे यांनी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (PCET) मोलाच्या सहकार्याचाही उल्लेख केला. पीसीसीओईआर, रावेत या संस्थेने त्यांना महाविद्यालयात संशोधनासाठी अत्यंत पोषक आणि अनुकूल वातावरण (Research Environment) उपलब्ध करून दिले, तसेच पीएच.डी. पूर्ण करताना जेव्हा जेव्हा आवश्यकता भासली, तेव्हा सर्व स्तरांतून आवश्यक ती सर्व मदत केली. त्यामुळे या यशात संस्थेचे योगदानही अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.



गणितातील 'व्होल्टेरा इंटिग्रल इक्वेशन्स' हे अत्यंत महत्त्वाचे आणि पायाभूत समीकरण मानले जाते, ज्याचा थेट उपयोग अनेक वास्तविक जगातील प्रक्रियांमध्ये (Real-world applications) केला जातो. हे क्षेत्र मुख्यत्वे 'मेमरी डिपेंडंट सिस्टीम्स' (Memory Dependent Systems), संचयी प्रभाव (Cumulative Effect Behavior Systems) आणि भूतकाळातील अवलंबित्वावर (Past Dependence) आधारित प्रक्रियांशी संबंधित आहे. यामुळेच सध्याच्या काळात इंजिनिअरिंगसह विविध वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रांमध्ये या गणिताला प्रचंड मागणी असून, हे एक वेगाने विकसित होणारे (Emerging rea) क्षेत्र मानले जाते.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/फौजदारी / वारस नोंद/२०/२०२६ अकोले दि. ०१/०९/२०२६

श्रीम. प्रभावती विठ्ठल बांगर, रा. पाभुळवंडी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे पती कै. विठ्ठल सावळेराम बांगर हे दि. ०९/०८/२०२६ रोजी चैतन्य हॉस्पिटल संगमनेर येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे प्रवरा विद्यालय इंदोरी येथे उपशिक्षक या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | प्रभावती विठ्ठल बांगर | ४६ | पत्नी |
| २ | ऋषिकेश विठ्ठल बांगर | २१ | मुलगा |
| ३ | प्राची विठ्ठल बांगर | २३ | मुलगी |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### रुरल हायस्कूल वडाळा मिशन येथे होळकर मॅडम यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

रुरल हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, वडाळा मिशन येथील ज्येष्ठ शिक्षिका होळकर मॅडम यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. हायस्कूलच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात शिक्षक, कर्मचारी, आजी–माजी शिक्षक तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक एल. जी. गायकवाड होते. यावेळी एफ. एम. चर्चचे धर्मगुरू साळवे पाळक, संस्थेचे सेक्रेटरी बॉबी गिरी, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक गायकवाड म्हणाले की, शिक्षकी पेशा म्हणजे देवाची सेवा करण्याचे एक पवित्र माध्यम आहे. या क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि परमेश्वराची भीती बाळगून काम करणाऱ्यांचे आयुष्य निश्चितच आशीर्वादित होते. त्यांनी होळकर मॅडम यांना सेवानिवृत्तीनंतर निरामय व आनंदी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यालयाच्या वतीने होळकर मॅडम आणि त्यांचे पती रणसिंग सर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### भारत गाडेकर , सुधाकर सातपुते, बाळासाहेब गांगुर्डे यांचा पदोन्नती पदग्रहण सोहळा उत्साहात



पाथर्डी (समर्थ गांवकरी)

श्री तिलोक जैन विद्यालयाचे पर्यवेक्षक भारत गाडेकर यांची विद्यालयाच्या उपमुख्याध्यापक पदी, उच्च माध्यमिक विभागाचे विभाग प्रमुख सुधाकर सातपुते यांची पर्यवेक्षक पदी, तर एन .सी .सी विभागाचे प्रमुख बाळासाहेब गांगुर्डे यांची प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल विद्यालयात सदिच्छा व पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास संस्थेचे सचिव सतिश गुगळे, खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त राजेंद्र मुथ्था, पोलीस उपनिरीक्षक रेवती भोसले, विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी संस्थेचे सचिव सतिश गुगळे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देताना त्यांनी आजवर विद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व विविध उपक्रमांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला. त्यांच्या अनुभवाचा, कार्यक्षमतेचा आणि नेतृत्वगुणांचा विद्यालयाच्या प्रगतीस निश्चितच फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच नवीन जबाबदारीच्या माध्यमातून विद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन केले.

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या स्विमिंग खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

दि. प्रवरानगर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्विमिंग स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या काळे तेजस याने १५०० मी. फ्रीस्टाईल प्रकारात प्रथम क्रमांक व ८०० मी. फ्रीस्टाईल प्रकारात द्वितीय क्रमांक मिळविला तर कोळपे ओंकार याने १५०० मी.फ्रीस्टाइल प्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या दोघांची सा.फुले पुणे विद्यापीठ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच किरण कदम ५० मी. व ४०० मी., कृष्णा वायकर ४०० मी., सुमित शिंदे १०० मी., शितोळे कृष्णा २०० मी. या सर्व खेळाडूंनी फ्रीस्टाइल प्रकारामध्ये चांगली कामगिरी केली.

या खेळाडूंचे सर्वत्र श्रीगोंदा परिसरात कौतुक होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मान. बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मान. राहुलदादा जगताप, मान.महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. नितीन थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात , प्रा. रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी स्विमिंग खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा.कल्पना बागुल व क्रीडा शिक्षक संजय डफळ यांचे मार्गदर्शन लाभले

# साळी समाजाचे आद्य पुरुष भगवान जिव्हेश्वर यांची जन्मोत्सव संपन्न


अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पृथ्वीवर पहिला हातमाग चालून वस्त्र निर्माण करणारे भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव महाराष्ट्र,गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा, मध्यप्रदेश, कर्नाटक या राज्यात तर नगरमधील बागडपट्टी,सावेडी, दिलीगेट येथील मंदिरासह जिल्हात गेल्या १५ दिवसा पासून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला अशी माहिती स्वकुळसाळी समाजाचे महेश कांबळे यांनी दिली आहे.

साळी समाजाचे कुल दैवत भगवान जिव्हेश्वर याच्या विषयी माहिती देताना ते म्हणाले भगवान जिव्हेश्वरांचे संक्षिप्त चरित्र मध्ये आद्य वस्त्र निर्माता भगवान जीवेश्वर आहे हे आपल्याला समजते. कैलास पुराच्या विराजत असलेल्या प्रथम गणांनी श्री शिवशंकराची स्तूती केली.ते ध्यानावस्थेतून जाग्रस्थ झाले,महाविष्णुस व अमरगणांना पाहून विस्मित झाले. स्मित करून त्यांच्या येण्याचे कारण त्यांनी विचारले.देवांनी निवेदिले, परमेश्वरा,आदिमायेकडून सष्टीची रचना झाली. तिच्या सत्व,रज,तम या त्रिगुणांपासून ब्रम्हा, विष्णू, महेशाची उत्पत्ती झाली. ब्रम्हाने ब्रम्हांडाची रचना करून,पंचमहाभूतांना निर्मून, देव,दानव,मानव व विभिन्न जीवकोटिंना जन्म दिला.पण देव,दानव व मानव इतर प्राण्यासारखे नग्नावस्थेतच आहेत.त्यांच्या लज्ञा रक्षणार्थ वस्त्राची निर्मिती झाली पाहिजे.हे महादेवा, वस्त्रानिर्मितीची व्यवस्था आपण करावी अशी विज्ञापना करण्यास आपल्या जवळ आम्ही आलो आहोत' तेव्हा महादेवांनी आदिमायेचे स्मरण केले.तिने प्रत्यक्ष होऊन श्रीशंकरास म्हटले,ऋपरमेश्वरा, वस्त्र निर्मिणार्या पुरूषाची आपण उत्पत्ती करा.'

आदिमायेची ईच्छा स्पष्ट होताच उपस्थित देवांनी परमेश्वराकडे उत्सुकतेने पाहिले देवतांच्या व आदिमायेच्या इच्छिताप्रमाणे महादेवाने आपल्या जिव्हेच्या अग्रभागातून कोटी सूर्याच्या प्रकाशाने युक्त अशा एका दिव्य शिशूस उत्पन्न केले.सारा कैलास आनंदविभोर झाला.आनंद प्रदर्शक मंजुळ घंटानाद होऊ लागला.श्रावण शुद्ध त्रयोदशी सोमवार हा तो दिवस होता.या शुभदिनी कैलासातील सार्या सुवासिनींनी नवजात अर्भकास पाळण्यात घालून त्याचे नामकरण केले.श्री शंकराच्या जिव्हेतून उद्भवल्यामूळेऋजिव्हेश्वर' ,त्रिगुणात्मांना साहाय्य कर्ता म्हणूनऋस्वकुळ' व सुर्योदय समयी जन्मला म्हणून ऋसुर्यवंशी' अशा प्रकारे बालकाचे नामकरण झाले.सार्या जगाला वस्त्रप्रावरणांचा पुरवठा करून मनवांच्या लज्ञेचे आणि मानाचे रक्षण करो असा आशीर्वाद बालकास दिले

या साळी शब्दाचा उत्पत्तीच्या दृष्टीने अर्थ तो असा:शाल वक्षाची साल साळणारे ते साळी, किंवा शाली.ही प्रागैतिहासिक काळातील, समाज हा अर्धनग्न व वन्य अवस्थेत असतानाची घट्ना आहे.मानव वनचर असताना वस्त्रे म्हणून या सालीचाच उपयोग करीत होता. रामायण काळात राम, सीता व लक्ष्मणाने वनवासात जाताना याच सालीची वस्त्रे धारण केली होती.त्यास वल्कले म्हणत.वस्त्रे विणण्याची कला मानवास, साध्य झाल्यानंतर या साल साळणार्या साळ्यांनी स्वीकारली व ते साळी या नावानेच समाजात परिचित राहिले.ऋशाल' हा शब्द ही या शाल वक्षाच्या साली वरूनच प्रचारात आला आहे.ही अतिशय लवचिक असल्याने अंगाभोवती गुंडाळण्यास फारच सोईची आहे. मात्र तिचा आता कोणी उपयोग



करीत नाही. शाल वक्षाच्या सालीचे काम वक्षाच्या सालीचे संरक्षण तसे उघडया नागडया मानवाच्या शरीराचे या सालीद्वारे संरक्षण करणारे ते साळी.भाताच्या साळीस संस्कतमध्येऋशाली' हेच नाव आहे. भाताच्या गाभ्याचे संरक्षण करणारी ती साळ.साधर्म्याने मानवाच्या उघडया शरिराचे वस्त्राद्वारे रक्षण करणारे ते साळी.

## २२३ राहुरी विधानसभा मतदार संघातील पडताळणीत ३४,२२१ हजार मतदार वगळले

राहुरी (समर्थ गांवकरी)

२२३ राहुरी विधानसभा मतदारसंघातील विशेष सखोल पुनरीक्षण (एस.आय.आर.) अंतर्गत पहिल्या टप्प्यातील मतदार पडताळणीचे काम पूर्ण झाले असून, सोमवारी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२२३ राहुरी विधानसभा मतदारसंघात एस.आय.आर. पूर्वी एकूण ३,२९,८२९ इतके मतदार होते. प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदारांचा समावेश असून, प्रारूप यादीत २,९५,६७२ एकूण ३४,२२१ मतदार वगळण्यात आले आहेत. यामध्ये १३९२८ मयत, २९२८ अनुपस्थित, ११६८५ कायमस्वरूपी स्थलांतरित, ५६११ दुबार आणि इतर ६९ मतदारांचा समावेश आहे.

सदर प्रारूप मतदार यादी तहसीलदार कार्यालय राहुरी,पाथर्डी,अहिल्याआनगर आणि सर्व मतदान केंद्रांवर बी.एल.ओ. यांच्याकडे निरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

१ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदणीसाठी नमुना ६ भरावा. तसेच नाव वगळणीसाठी नमुना ७ व दुरुस्तीसाठी नमुना ८ हा ३० सप्टेंबरपर्यंत भरता येईल.

प्रारूप यादीतून चुकून वगळलेल्याा मतदारांनी नविन नाव नोंदणीसाठी नमुना ६ भरावा. या कामात काही अडचण अथवा शंका असल्यास निवडणूक शाखेत मतदार सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती अनुपसिंह यादव, उपजिल्हामधिकारी (पुनवर्सन) अहिल्याअनगर आणि तहसीलदार राहुरी डॉ. अमित पवार यांनी दिली.

## लेखी आश्वासनानंतर राजेंद्र म्हस्के यांचे आमरण उपोषण मागे

### १५ दिवसांचा अल्टिमेटम; सुधारणा न झाल्यास महावितरण कार्यालयावर ठेंभा मोर्चा

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महावितरणच्या विविध प्रलंबित प्रश्नांविरोधात शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांनी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण महावितरण प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर मागे घेण्यात आले. मात्र, दिलेल्या आश्वासनांची १५ दिवसांत प्रभावी अंमलबजावणी न झाल्यास महावितरण कार्यालयावर ठेंभा मोर्चा काढण्याचा इशारा राजेंद्र म्हस्के यांनी दिला आहे.

उपकार्यकारी अभियंता इंदूरकर साहेब तसेच सर्व शाखा अभियंता यांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून लेखी आश्वासन दिले. त्यामध्ये शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात येतील व वीजपुरवठा वारंवार खंडित होऊ दिला जाणार नाही, तसेच लाईनवर वारंवार परमिट घेण्याचे प्रकार टाळून लाईनचा आवश्यक देखभाल–दुरुस्तीचा मेंटेनन्स करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

तसेच सायंकाळी ६ ते ९ या वेळेतील लोडशेडिंग बंद करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल, नवीन कृषीपंप वीजजोडण्या सुरू करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा केला जाईल आणि जुन्या वीजजोडण्यांवर नवीन डी.पी. मंजुरीचा प्रस्ताव प्राप्त होताच तो तातडीने वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.




याशिवाय रस्त्यालगत सोलर कंपनीने उभारलेले वीजेचे पोल रस्त्यापासून १५ फूट अंतरावर शिफ्ट करण्यात येतील, असेही लेखी आश्वासन महावितरण प्रशासनाने दिले.

या लेखी आश्वासनानंतर नायब तहसीलदार जाधव साहेब यांच्या हस्ते राजेंद्र म्हस्के यांनी आमरण उपोषण मागे घेतले. मात्र, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची मुदतीत पूर्तता न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी हरिदास शिर्के, अनिल ठवाळ, रघुनाथ सूर्यवंशी, शहाजी कोरडकर, अशोक नवले, शशिकांत पवार, महादेव म्हस्के, अरुण जगताप, राजेंद्र विधाटे, गंगाराम दरेकर, हरिभाऊ खामकर, विलास म्हस्के यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## दप्तरमुक्त शिक्षणाचा जय मल्हार विद्यालयात अनोखा उपक्रम

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पिंपळावरोठा येथील जय मल्हार विद्यालयात आज दप्तर मुक्त शाळा हा अनोखा उपक्रम साजरा करण्यात आला. दप्तराचे ओझे कमी करून संस्कारक्षम तसेच इतर उपक्रमाद्वारे हा दिवस साजरा करण्यात आला. सुरुवातीला परिपाठ इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनीनी साजरा केला श्रावणी मुळे हिने उत्कृष्ट सूत्रसंचालन करून परिपाठाचे नियोजन केले.नंतर सर्व विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या.

यानंतर कवयात या उपक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक बी आर उंडे यांनी बैठे व उभे राहून विविध प्रकारचे हात व कवायत घेतली. सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून सहकार्य केले.नंतर योगासन व आनापान ही कृती घेण्यात आली अनापान म्हणजे श्वासाच्या नैसर्गिक



हालचालीकडे शांतपणे लक्ष देणे होय.आनापांचा मंत्र श्वासावर लक्ष मनात शांतता यानुसार विद्यार्थी ध्यानधारणेमध्ये बसून केवळ श्वासाकडे लक्ष देऊन ही कृती अत्यंत संयमाने करत होते. मनाची एकाग्रता झाल्याशिवाय स्मरणशक्ती वाढत नाही ही विद्यार्थ्यांना गरकळ बी एस यांनी समजावून सांगितले.

वाचाल तर वाचाल या संकल्पनेप्रमाणे आठवी,नववी व दहावी विद्यार्थ्यांना विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी दिले गेले.आठवीचे वर्गशिक्षक जरांगे सर, नववीचे वर्गशिक्षक केदारी सर व दहावीचे वर्गशिक्षक गरकळ सर यांनी वर्गानुसार पुस्तक वितरण करून विद्यार्थ्यांना पुस्तक वाचण्यासाठी दिले व त्यांचे वाचन घेतले.

मुख्याध्यापक बी आर उंडे, जेष्ठ शिक्षक जरांगे सर, गरकळ सर,केदारी सर, ग्रंथालय प्रमुख भगवान भांबरे, संतोष घुले, नारायण पुंडे,गौरी जगताप व छाया केदारे यांनी उत्कृष्ट नियोजन करून दप्तर मुक्त शाळा हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

## अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणूक: कोर्टाच्या दणक्यानंतर प्रताप ढाकणेंच्या कट्टर समर्थकाचा ठराव मंजूर

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर हरकती दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. हरकती दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी २०४ हरकती आणि सुचना तर एकूण एकूण २३८ हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक १२३ हरकती एकट्या संगमनेर तालुक्यातून दाखल झाल्या आहेत.

जिल्हा बँकेच्या प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सुनावणी होवून अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम अंदाज १५ ते २० दिवसांनी जाहीर होईल. दरम्यान, यंदा निवडणुकीसाठी बँकेचे ३ हजार ६७७ मतदार आहेत. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले असून २३३ संस्थांनी ठराव सादर केले नाहीत. ३१ ऑगस्ट ते १० सप्टेंबरपर्यंत हरकतींवर सुनावणी होणार आहे. त्यानंतर १५ सप्टेंबरला




अंतिम मतदार यादी जाहीर होणार आहे.

तालुकानिहाय दाखल हरकतीमध्ये नेवासा १४, अकोले १४, पारनेर १०, जामखेड ७, कर्जत १९, श्रीगोंदा १२, नगर तालुका १२, राहुरी ३, श्रीरामपूर ५, राहाता ९, पाथर्डी ६, शेवगाव ४ कोपरगाव ९, संगमनेर १२३ अशा एकूण एकूण २३८ दाखल आहेत. जिल्हा बँकेच्या एकूण हरकतींपैकी निम्म्याहून अधिक हरकती संगमनेर तालुक्यातून आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. आता निवडणूक प्राधिकरणाकडून या सर्व हरकतींची छाननी व सुनावणी करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# राखी बांधली... विकारांना बांध घातला : ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी

## पारनेरमध्ये ब्रह्माकुमारी सेंटरचा आध्यात्मिक उपक्रम; राजयोग मेडिटेशनचा संदेश

निघोज (समर्थ गांवकरी)

राखीचा धागा मनगटावर बांधला जातो; मात्र त्यामागचा खरा संदेश मनाशी जोडला जातो. विचारांची शुद्धता, मनाची सकारात्मकता, आत्मिक शक्ती आणि माणुसकी जपण्याचा संकल्प म्हणजेच रक्षाबंधनाचा खरा आध्यात्मिक अर्थ असल्याचे प्रतिपादन ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी यांनी केले. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या वतीने पवित्र रक्षाबंधन पर्वानिमित्त आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमातून रक्षाबंधनाला आध्यात्मिक विचारांची जोड देत राजयोग मेडिटेशन, पवित्रता, शुद्ध विचार आणि आत्मिक शक्तीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी प्रास्ताविक केले. पारनेर सेंटरच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध आध्यात्मिक उपक्रमांची माहिती देताना त्यांनी नियमित राजयोग मेडिटेशनमुळे मनाची एकाग्रता वाढण्यास, सकारात्मक विचार निर्माण होण्यास आणि आत्मिक शांती अनुभवण्यास मदत होत असल्याचे स्पष्ट केले.

ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी म्हणाल्या, ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून विविध तालुक्यांमध्ये जाऊन राजयोग मेडिटेशनचा संदेश दिला जात आहे. स्थानिक बहिणींच्या सहकार्याने नागरिकांना परमात्म्याचा संदेश तसेच बाबांच्या मुरलीतील आध्यात्मिक विचारांची माहिती दिली जाते. समाजातील विविध घटकांना राखी बांधून पवित्रता आणि राजयोगाचा संदेश देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

सध्याचा काळ आव्हानात्मक आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने स्वतःमधील सकारात्मकता वाढविणे गरजेचे आहे. राजयोग मेडिटेशनमुळे विचार शुद्ध होतात, मनोबल वाढते आणि जीवनात सुख–शांतीचा अनुभव घेता येतो, असेही राजेश्वरी दीदी यांनी सांगितले.

माउंट आबू, राजस्थान येथून येणाऱ्या पवित्र राखीच्या माध्यमातून उपस्थितांना जीवनातील पवित्रता आणि शुद्धतेची आठवण करून देण्यात आली. आपण सर्वजण एका ईश्वरीय कुटुंबाचा भाग आहोत, या भावनेतून प्रेम, शांती आणि परमात्मस्मृतीचा संदेश देण्यात आला.

राखी बांधली... आता संकल्पही बांधूया!

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दत्ता गाडगे यांनी रक्षाबंधनाचा सामाजिक आणि मानवी दृष्टिकोन उपस्थितांसमोर मांडला.

रक्षाबंधन हा आपल्या संस्कृतीतील अतिशय सुंदर आणि पवित्र सण आहे. रक्षाबंधन म्हटलं की आपल्या मनात प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सुरक्षिततेची भावना निर्माण होते. मात्र रक्षाबंधनाचा अर्थ केवळ भाऊ–बहिणीच्या नात्यापुरता मर्यादित नाही. रक्षा म्हणजे केवळ शरीराची नाही, तर विचारांची, संस्कारांची, नात्यांची आणि माणुसकीचीसुद्धा रक्षा, असे दत्ता गाडगे यांनी सांगितले.



आज मनगटावर राखी बांधताना त्यासोबत मनातही एक संकल्प बांधण्याची गरज आहे. वाईट विचारांपासून स्वतःचे रक्षण करूया, नात्यांमध्ये प्रेम टिकवूया, गरजू व्यक्तीच्या मदतीला धावून जाऊया आणि समाजात बंधुभाव निर्माण करूया, असे आवाहन त्यांनी केले.

आजच्या काळात पैसा आणि सुविधा वाढल्या आहेत; मात्र मनःशांती कमी होत चालली आहे. त्यामुळे अशा आध्यात्मिक उपक्रमांची समाजाला नक्कीच गरज आहे, असेही गाडगे यांनी स्पष्ट केले.

यावेळी दत्ता गाडगे यांनी उपस्थितांकडून सकारात्मक जीवनाचा संकल्प करून घेतला–

मी स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवेन, माझ्या कुटुंबात प्रेम वाढवेन, समाजात माणुसकी जपेन आणि प्रत्येकाच्या जीवनात शांतीचा संदेश देण्याचा प्रयत्न करेन. मनगटावरील राखी काही दिवस राहील; पण मनामध्ये बांधलेलं प्रेम आणि माणुसकीचं बंधन आयुष्यभर राहू दे! असा भावनिक संदेश देत दत्ता गाडगे यांनी सर्वांना पवित्र रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### संस्कृत ही सर्व भाषांची जननी : डॉ. अनिरुद्ध मंडलिक



(समर्थ गांवकरी)

संस्कृत ही प्राचीन भाषा आहे. या भाषेचे वैभव थोर आहे. भाषा प्रवाही व काळा रूप बदलत असते. या भाषेचा अभ्यास वैदिक काळापासून झालेला आहे. संस्कृत भाषा ही मधुर आणि ज्ञानसंपन्न अशी भाषा आहे. संस्कृत भाषा ही केवळ एक भाषा नसून ती आपल्या भारतीय संस्कृतीची आणि समृद्ध ज्ञानाची परंपरा आहे. तसेच ती सर्व भाषांची जननी आहे. असे विचार संगमनेर महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अनिरुद्ध मंडलिक यांनी संस्कृत दिनाच्या प्रसंगी अँड.एम.एन.देशमुख महाविद्यालय, राजूर येथे मांडले. सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी अँड. एम.एन.देशमुख महाविद्यालयात प्रा. डॉ. अनिरुद्ध मंडलिक यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्कृत सप्ताहाचे आयोजन केले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्कृतचे महत्त्व पटवून दिले. कलामंडळ कार्याध्यक्ष प्रा. डॉ. द. के. गंधारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जी. एस. कुसमुडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. बी. एम. पवार यांनी केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख तसेच वाङ्.मय मंडळातील सर्व सदस्य व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### चाईल्ड फंड इंडिया व बजाज फिनसर्वच्या गावभेटी व बैठका

जुन्नर (समर्थ गांवकरी)

दिनांक १२ ऑगस्ट रोजी चाईल्ड फंड इंडिया च्या थशल डरषश थळीश–खख प्रकल्प क्षेत्रातील सितेवाडी, मढ व तळेरान येथे मान्यवरां ची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली.यावेळी बजाज फिनसर्व च्या नॅशनल लीड, सी.एस.आर श्रीमती लीना राजन,सीनियर मॅनेजर सीएसआर श्रीमती योजना पलसे,कम्युनिकेशन टीमच्या स्वप्ना वाझलवार तसेच चाईल्ड फंड इंडिया चे कार्यकारी संचालक आनंद विश्वकर्मा,सोनिया मदान, कम्युनिकेशन मॅनेजर,शील कुमार, महाराष्ट्र प्रमुख जिनू वर्गीस,जुन्नर येथील वरिष्ट प्रकल्प अधिकारी अभिजीत मदने यांच्यासह सर्व संबंधित कार्यकर्ते उपस्थित होते.

सितेवाडी,मढ व तळेरान येथे शाळेतील मूले,शिक्षक, ग्रीन कमिटी सदस्य यांच्याशी ऑनलाईन आणि ऑफलाईन सुरक्षितता संवाद साधला व शाळेची पाहणी केली.यावेळी सितेवाडी गावच्या सरपंच दिपाली पाटेकर,शीतळेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष हांडे,ग्रीन कामेटीचे सदस्य मिथुन मोजाड व इतर शिक्षक,पालक उपस्थित होते. याचबरोबर मढ येथे ९ ते १४ वयोगटातील मुलांशी स्पोर्ट्स फॉर प्रोटेक्शन उपक्रमांबाबत चर्चा केली,तसेच त्यानंतर तळेरान येथे वेब सेफ अँड वाईज प्रकल्प बाबत गाव पातळीवरील बाल संरक्षण समितीतील सदस्यांबरोबर व विविध गावचे सरपंच, उपसरपंच,अंगणवाडी सेविका पोलिस पाटील,शिक्षक, शासकीय,सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली व गावपातळी वरील समस्या व प्रश्न जाणून घेतले व त्यानंतर कम्युनिटी लंच करण्यात आले.

### तिसऱ्या श्रावण सोमवार च्या कोतुळेश्वर महाआरतीचा मान आमदार डॉ, लहामटे यांना

**आमदारांना फुगडी खेळण्याचा मोह, मनोभावे घेतले दर्शन**

कोतुळ (समर्थ गांवकरी)

कोतुळ परिसरातील अति प्राचीन व पांडप प्रताप या पवित्र धार्मिक ग्रंथात उल्लेख असलेल्या कोतुलेश्वराच्या दर्शनाच्या महाआरतीचा मान तालुक्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांना यावेळी देण्यात आला,

यावेळी आमदारांना फुगडी खेळण्याचा मोह आवरता आला नाही

आमदार लहामटे यांचे टाळ व मृदुगाच्या गजरात शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले, आमदार डॉ किरण लहामटे यांच्या अथक प्रयत्नातून श्री कोतुलेश्वर मंदिराचा समावेश अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ योजनेत झाल्याने कोतुलेश्वर तीर्थ क्षेत्राला ब वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे, परिसरातील कोतुलेश्वर हे जागृत दैवत असून वर्षभर परिसरातून व महाराष्ट्रातून अनेक भाविक येथे दर्शनासाठी गर्दी करतात, मंदिराचा परिसर अत्यंत विलोभनीय असून मंदिराच्या जवळूनच मुळा नदी प्रवाहित झाली आहे, परिसरात पिंपळ वृक्ष भाविकांना मोहून टाकतो, जवळच महादेवाची प्रचंड मोठी विलोभनीय मूर्ती जटाम धून वाहणारे पाणी, समोर आकर्षक नंदी भाविकांचे विशेष आकर्षण ठरले आहे, पावसाळ्यात मंदिर परिसर पाण्याने वेढलेला असल्याने अधिकच मोहक वाटतो, जवळच योजनेच्या माध्यमातून शिवपार्वती मंगल कार्यालय गरजूंना महत्वाचे ठरत आहे, वारकरी विद्यालयातील विद्यार्थी मंदिराची देखभाल करताना दिसून येतात,परिसर वृक्षवेलींनी वेढलेला असल्याने भाविकांना भुरळ पडल्याशिवाय राहत नाही, पावसाच्या श्रावणसरींनी भाविकां ची पावले थिरकतानाता दिसून येतात.

# अहिल्यानगर जिल्हास्तरीय 'करिअर मॅपिंग एकदिवसीय कार्यशाळा' उत्साहात संपन्न

## छत्रपती कॉलेजमध्ये जिल्ह्यातील समन्वयक व संसद विद्यार्थ्यांचा सहभाग

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच त्यांच्या आवडी, क्षमता,ख कौशल्ये आणि भविष्यातील संधींचा विचार करून त्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय करिअर मॅपिंग एकदिवसीय कार्यशाळेचे' आयोजन दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे करण्यात आले. सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात या कार्यशाळेचा शुभारंभ झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीगोंदा तालुक्याचे युवा नेते मा. दिग्विजय राजेंद्रदादा नागवडे आणि विश्वस्त प्रा.सुरेश रसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीशचंद्रजी सूर्यवंशी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे युवा नेते दिग्विजय राजेंद्रदादा नागवडे यांनी अचूक करिअर मॅपिंग, प्रामाणिक कष्ट आणि कामातील सातत्य या बळावरच तरुण वयात संघर्षावर मात करून यश मिळवता येते आणि तरुणांनी आपल्या ऊर्जेचा योग्य वापर करून ध्येयाकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. सतीशचंद्रजी सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांनुसार योग्य करिअरची निवड करता यावी तसेच भविष्यातील संधींचा प्रभावीपणे उपयोग करता यावा, यासाठी अशा कार्यशाळांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

उद्घाटन सत्राचे आभार समन्वयक डॉ.विजय इथापे यांनी मानले.

सकाळी ११.३० ते दुपारी १.०० या वेळेत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात मा. यशवंत शितोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, कौशल्य विकास, स्पर्धात्मक परीक्षांचे क्षेत्र तसेच भविष्यातील करिअर नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्ये आत्मसात करून उपलब्ध संधींचा योग्य पद्धतीने उपयोग करावा, असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर दुपारी १.०० ते २.०० या वेळेत मा. भूषण कोळेकर, माजी सहाय्यक महाव्यवस्थापक (GM), स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शनपर सत्र झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षा, बँकिंग क्षेत्र, व्यवसाय, रोजगाराच्या विविध संधी आणि करिअर नियोजन याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेसोबत आवश्यक कौशल्ये विकसित करून भविष्यातील संधींसाठी स्वतःला तयार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुपारी २ ते २:३० या वेळेत दादा पाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथ नगर येथील विद्यार्थिनी कु. स्नेहल नेहुल तसेच आयोजक कॉलेज मुख्यमंत्री सार्थक डोंबे, सोनई कॉलेजचे समन्वयक प्रा.राहुल निपुंगे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले व कार्यशाळेतून मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांनी आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींची माहिती मिळण्यासाठी



आणि योग्य दिशा निश्चित करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

या मार्गदर्शन सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रता, कौशल्ये, आवडीनिवडी आणि उपलब्ध रोजगाराच्या संधी यांचा विचार करून योग्य करिअरची निवड कशी करावी, याबाबत मार्गदर्शन मिळाले. तसेच बदलत्या रोजगाराच्या संधी, स्पर्धात्मक युगातील आवश्यक कौशल्ये आणि भविष्यातील करिअरच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या विविध बाबींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा समन्वयक डॉ. विलास सुद्रिक यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अहिल्यानगर जिल्हा समन्वयक किशोर गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, प्राध्यापक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य करिअरची दिशा मिळावी, त्यांच्या क्षमतांची ओळख होऊन त्यानुसार करिअरची निवड करता यावी आणि उपलब्ध संधींचा प्रभावीपणे उपयोग करता यावा, या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरली. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकारात्मक आणि उत्साहपूर्ण वातावरणात कार्यशाळेची सांगता झाली. कार्यशाळा सुरळीत पार पाडण्यासाठी छत्रपती कॉलेजमधील करिअर संसद विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# निवृत्त ज्येष्ठ वीज कर्मचारी-अधिकाऱ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

अहिल्यादेवी नगर (समर्थ गांवकरी)




महाराष्ट्र राज्य वीज मंडळात प्रदीर्घकाळ सेवा बजावून निवृत्त झालेल्या ज्येष्ठ कार्यकर्ते, पदाधिकारी यांचा महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. अहिल्यादेवी नगर येथील हॉटेल यश ग्रँड या ठिकाणी या मेळाव्याचे आयोजन केले होते. अध्यक्ष स्थानी जेष्ठ पदाधिकारी रविंद्र डबीर हे होते.या मेळाव्यात जुन्या सहकाऱ्यांनी एकत्र येत सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला.

वीज उद्योगाच्या विकासात कामगार महासंघाच्या निवृत्त सभासदांचे योगदान मोलाचे असून, त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग आजच्या पिढीतील कर्मचारी पदाधिकारी व अधिकाऱ्यांना व्हावा, यासाठी अशा स्नेहमेळाव्यांचे आयोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादन वीज कामगार महासंघाचे जेष्ठ मार्गदर्शक विलास झोडगेकर यांनी केले.

मेळाव्यात निवृत्त सभासदांच्या विविध समस्या, पेन्शन, वैद्यकीय सुविधा, कल्याणकारी योजना तसेच निवृत्तीनंतरच्या सामाजिक जीवनाबाबत चर्चा करण्यात आली. अनेक वर्षांनंतर सहकारी भेटल्याने उपस्थितांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी ज्येष्ठ कर्मचारी व पदाधिकारी रविंद्र डबीर, पद्माकर कुलकर्णी आसाराम घुले, बद्रीनाथ डागा, प्रकाश कुलकर्णीयांचा सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ सेवेला गौरविण्यात आले. सेवानिवृत्ती ही सेवेला पूर्णविराम नसून अनुभवातून समाजाला योगदान देण्याची नवी सुरुवात आहे, असा संदेश यावेळी बोलताना वीज कामगार महासंघांचे वित्त प्रभारी रविंद्र काडके यांनी दिला .

कार्यक्रमास महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे पदाधिकारी,

निवृत्त कर्मचारी सुभाष लोंढे सुधीर दीक्षित राजेंद्र कुलकर्णी, सुभाष जगदाळे, अनिल चारणे,यांच्या सह वीज क्षेत्रातील माजी सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत धर्माधिकारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे झोन अध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर सचिव गणेश कुंभारे राहुल वरघंटे अमोल आभाळे, वीज कामगार पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांची बॉक्सिंगमध्ये दमदार कामगिरी

## सीबीएसई साऊथ झोन-२ बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये तीन कांस्यपदकांची कमाई




संगमनेर (समर्थ गांवकरी)

क्रीडा क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांनी CBSE South Zone 2 Boxing Championship 2026-27 मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या स्पर्धेत शाळेच्या तीन विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तीन कांस्यपदकांची कमाई केली.

दक्षिण भारतातील विविध राज्यांमधून आलेल्या जवळपास ११०० खेळाडूंनी या प्रतिष्ठेच्या बॉक्सिंग स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्यामुळे स्पर्धेला मोठी रंगत प्राप्त झाली होती. अत्यंत चुरशीच्या आणि आव्हानात्मक सामन्यांमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त, जिद्द आणि उत्कृष्ट क्रीडाकौशल्याचे दर्शन घडवत उल्लेखनीय यश संपादन केले.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात मास्टर कृष्णराज कैलास गुंजाळ याने ४० ते ४२ किलो वजनी गटात दमदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. त्याच गटात मास्टर स्वराज समीर शिंदे याने ४२ ते ४४ किलो वजनी गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक मिळवले.

तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या गटात कु. तनिष्का अमोल सारंगधार हिने ४४ ते ४६ किलो वजनी गटात आत्मविश्वासपूर्ण खेळ करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले. तीनही खेळाडूंनी स्पर्धेदरम्यान दाखविलेली जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य विशेष कौतुकास्पद ठरले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम आणि प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. बॉक्सिंग प्रशिक्षक श्री. परमानंद बेलभक्ते यांनी विद्यार्थ्यांना नियमित सराव, तांत्रिक मार्गदर्शन आणि सामन्यांसाठी आवश्यक मानसिक तयारी करून घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धेत आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास मोठी मदत झाली.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत त्यांच्या क्रीडागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या शाळेच्या प्रयत्नांना या यशामुळे निश्चितच बळ मिळाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा आणि उपप्राचार्य योगेश आवारी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच प्रशिक्षक श्री. परमानंद बेलभक्ते यांचे अभिनंदन केले. शिक्षकवृंद, क्रीडा विभाग आणि प्रशिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# रवळगाव येथे चिंतामणी महादेव यात्रा उत्साहात संपन्न

## अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय वातावरणात सांगता ; हजारो भाविकांची उपस्थिती

मिरजगाव (समर्थ गांवकरी)

कर्जत तालुक्यातील रवळगाव येथे चिंतामणी महादेव यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाली.

रवळगाव येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी सालाबादप्रमाणे येथील चिंतामणी महादेव यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री.ग्रंथराज ज्ञानेश्वरी व शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे येथील यात्रा कमिटी, स्थानिक पदाधिकारी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.

या सप्ताह कालखंडात काकडा, विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, पारायण, प्रवचन, हरिपाठ, हरिकिर्तन व हरि जागर आदी कार्यक्रम पार पडले.

या सप्ताह सोहळ्याची सांगता सोमवारी दि.३१ ऑगस्ट रोजी काल्याच्या किर्तनाने करण्यात आली. यावेळी हभप देविदास महाराज निवळीकर यांचे काल्याचे किर्तन हजारो भाविकांच्या उपस्थितीत झाले.

तसेच आलेल्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संतपूजन व महाप्रसादाचे नियोजन माजी सरपंच व चेअरमन मोहन तात्या खेडकर यांचे पुतणे उद्योजक शहाजी भाऊ खेडकर यांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी परिसरातील



हजारो भाविक भक्तांनी हजेरी लावली. व मंदिराच्या गाभाऱ्यात जाऊन महादेवाचे दर्शन घेतले.

# अहिल्यानगर महापालिका रुग्णालयाच्या आरक्षणावर खासगी हॉस्पिटलची परवानगी शासनाच्या रडारवर

## सावेडीतील "EP-43' प्रकरणाला गंभीर वळण

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सावेडीतील महापालिका रुग्णालयासाठी विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या जागेवर खासगी रुग्णालयाला विकास व बांधकाम परवानगी देण्यात आल्याचे प्रकरण आता नगरविकास विभागाच्या वरिष्ठ स्तरावरील परीक्षणाखाली आले आहे. सामाजिक कार्यकर्ते शेख शाकीर यांनी प्रधान सचिवांकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर शासनाने नगररचना संचालकांसह संबंधित वरिष्ठ कार्यालयांकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय, सविस्तर अहवाल आणि विकास योजनेचा भाग नकाशा मागविला आहे.

मौजे सावेडी येथील सर्वे नं. 9/2/1B/2 व सर्वे नं. 12/4/12/5B मधील जागा विकास आराखड्यात "EP-43 Municipal Hospital Reservation' म्हणून महापालिका रुग्णालयासाठी आरक्षित आहे. मात्र, याच जागेवर खासगी रुग्णालयासाठी भूखंड एकत्रीकरण, विकास परवानगी व बांधकाम परवानगीची प्रक्रिया करण्यात आल्याचा आक्षेप आहे.

सावेडी परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती वाढलेली असून सार्वजनिक रुग्णालयाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत महापालिका रुग्णालयासाठी आरक्षित जागेवर खासगी रुग्णालयाला परवानगी दिल्याने भविष्यात महापालिकेचे स्वतःचे रुग्णालय उभारण्याच्या मूळ उद्देशालाच अडथळा निर्माण होऊ शकतो, असा मुद्दा शासनाकडे मांडण्यात आला आहे.

या परवानगी प्रक्रियेत महानगरपालिकेत शासनाकडून नियुक्त तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना श्रीमती स्नेहल यादव यांचा अभिप्राय व मान्यता न घेताच प्रस्ताव पुढे नेण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच संबंधित रुग्णालयासाठी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्याकडून आवश्यक Fire NOC न घेता महापालिकेच्या अग्निशमन अधीक्षकांची NOC ग्राह्य धरून पुढील परवानगी देण्यात आल्याची बाबही शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

या प्रकरणी शेख यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे स्वतंत्र तक्रार केली होती. त्यानंतर अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी २२ जुलै २०२६ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना पत्र पाठवून, भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने चौकशी आवश्यक असल्यास विभागाला प्राधिकृत करण्याची विनंती केली होती.

मात्र, नगरविकास विभागाने ३१ जुलै २०२६ रोजी हे प्रकरण तपासणी व नियमानुसार कार्यवाहीसाठी पुन्हा अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांकडे पाठविल्याने शेख यांनी प्रधान सचिवांकडे लेखी आक्षेप घेतला. ज्या प्रशासनाच्या परवानगी प्रक्रियेची तक्रार आहे, त्याच प्रशासनाकडे चौकशी देणे निष्पक्ष चौकशीच्या तत्त्वाशी विसंगत आहे, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

या आक्षेपानंतर शासनाने प्रकरणाची व्याप्ती वाढवत आयुक्त, मनपा, संचालक नगररचना, सहसंचालक नगररचना आणि सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडून अहवाल व अभिप्राय मागविला आहे.

शासनास सादर होणाऱ्या अहवालात EP-43 चे महापालिका रुग्णालय आरक्षण अस्तित्वात असताना खासगी रुग्णालयाला परवानगी कोणत्या आधारावर देण्यात आली, आरक्षण बदल अथवा रद्द करण्याचा सक्षम आदेश आहे का, शासन नियुक्त नगररचना



अधिकाऱ्याची मान्यता का घेण्यात आली नाही आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालकांची NOC नसताना महापालिकेची NOC कोणत्या अधिकारात ग्राह्य धरण्यात आली, या बाबींवर खुलासा अपेक्षित आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगररचनाकार वैभव जोशी आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रशासकीय कार्यकाळात ही परवानगी प्रक्रिया झाल्याने संबंधित निर्णयांची स्वतंत्र व वरिष्ठ स्तरावर चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे सावेडीतील EP-43 प्रकरण आता केवळ एका बांधकाम परवानगीपुरते मर्यादित राहिले नसून सार्वजनिक आरोग्यासाठी राखीव जमीन, नगररचना प्रक्रियेची वैधानिकता, अग्निसुरक्षा मंजुरी आणि प्रशासकीय जबाबदारी या सर्वच मुद्द्यांवर शासनाच्या परीक्षणाखाली आले आहे.